२०२४

# सुरक्षा अभियान


-: संपादक :-

डॉ. विलास पवार

















WITH BEST COMPLIMENTS FROM

CSS

Cyber Safe Society

**Mission & Vision**

**To create a cyber safe world**

**ACTIVITIES UNDERTAKEN**

- WORKSHOPS ON THE PREVENTION OF CYBER CRIME
- SEMINARS ON CYBER SAFETY
- GUIDANCE & SUPPORT TO VICTIMS
- PUBLICATIONS ON CYBER SECURITY
- TRAINING PROGRAMS FOR SAFE CYBER LIFE
- DISASTER MANAGEMENT
- AWARENESS CAMPAIGNS
- COLLABORATION WITH LAW ENFORCEMENT

Join our movement and make India a cyber safe country

www.cybersafesociety.org | +919167785599

**SAFETY FOR ALL**
**ALL FOR SAFETY**

President : Dr. Vilas Pawar    Secretary : Adv. Virat Vilas Pawar

M-3, Paradise Tower, Gokhale Road, Naupada,
Thane (W), Mumbai, Maharashtra 400602

# सुरक्षा अभियान

(REG. NO. MAH/MAR/23893/TC)

## २०२४

❁ संपादक ❁

**डॉ. विलास ज. पवार**

प्रकाशक : ओम पब्लिकेशन

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा,
ठाणे (प.) ४००६०२.

स्वागत मूल्य - १८०/-

'सुरक्षा अभियान' एक चळवळ आहे. सुरक्षा या विषयात ज्यांना रस आहे, ज्यांना या क्षेत्रात काम करायचे आहे त्यांनी अवश्य संपर्क साधावा.

---

ओम पब्लिकेशने 'सुरक्षा अभियान' हा वार्षिक विशेषांक संपादक, मालक, प्रकाशक डॉ.विलास पवार यांनी एम-३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे(प.) ४००६०२.दूरध्वनी क्रमांक - ०२२-२५३६४१४१ येथे छापून येथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | मी रस्ता बोलतोय .... | - | श्रध्दा वझे | ५ |
| २) | अपघात एक भयानक समस्या | - | चारूलता कुळकर्णी | ११ |
| ३) | रस्त्याने जाताय सावधान | - | वैजयंता साळवे | १५ |
| ४) | रोड सेफ्टी-रस्ता सुरक्षा | - | शुभांगी घाग | १७ |
| ५) | रहदारीच्या व्यवस्थापनेशी तडजोड म्हणजे मृत्यूशी जोड | - | निलेश बामणे | २१ |
| ६) | आपण हे करूया? | - | श्रीप्रकाश सप्रे | २५ |
| ७) | रस्ते ,रहदारी, वाहतूक | - | भालचंद्र काळे | २७ |
| ८) | वाहन अपघातातील रोग्याची तपासणी | - | डॉ. सुभाष म्हैसकर | ३१ |
| ९) | दुर्दशा | - | शोभना कारंथ | ३५ |
| १०) | सुरक्षा अभियान | - | राजश्री खरे | ३९ |
| ११) | सुरक्षा | - | धनश्री क्षिरसागर | ४३ |
| १२) | सुरक्षा | - | एम. बी. कोल्हे | ४७ |
| १३) | रास्ता सुरक्षा कैसे टाला जा सकता है! | - | उषा गौनियाल | ५१ |
| १४) | अपघात एक यक्ष प्रश्न | - | चारूलता कुळकर्णी | ५७ |
| १५) | रस्ता सुरक्षेमध्ये शिक्षकांचा सहभाग | - | शत्रुघ्न ईश्वर | ६१ |
| १६) | सेवेचा पाझर | - | यशवंत सुरोशे | ६५ |
| १७) | चुका आणि शिका | - | शुभांगी गादेगावकर | ६९ |
| १८) | खड्ड्यात रस्ते की रस्त्यांत खड्डे | - | चारूलता कुळकर्णी | ७५ |
| १९) | रस्ते सुरक्षा | - | सुभाष वस्त | ७९ |

- काव्यसृष्टी .................................................... ८३
- इको ड्रायव्हिंगची आवश्यकता ....................................... ८७
- रस्ता सुरक्षा नियम ............................................... ९२
- वाहन परवाना कसा मिळवावा ........................................ ९७
- रस्त्यावरील वाढते अपघात, कारणे व उपाय ............................ १००

## संपादकीय.......

# रस्ता सुरक्षा हिच जीवन सुरक्षा

आपण सर्वजण धकाधकीच्या जीवनात जगत आहोत. प्रत्यक्षात नियम आणि त्याचे नियमन शिस्त यांना आपण पाळायचचे नाही हे ठरवून चाललेलो असतो, प्रत्येक नियमाचा धाक फार कमी प्रमाणात आपल्या सगळयांना वाटतो. कोणताही नियम किंवा शिस्त मोडताना आपण नियम का तोडला तो यांची कारणे सांगितली जातात त्यातील लोकप्रिय कारण म्हणजे माझ्या पुढच्यांनी तो नियम तोडला तो माझ्याकडून ही तुटला आहे. अर्थातच मला शिक्षा झाली तर त्यासाठी समोरच्याला पण शिक्षा झाली पाहीजे असा अटटहास. परंतु सुरक्षेच्या संदर्भात नियम मोडल्याने किंवा शिस्तीचे नियमन टाळल्याने शिक्षा भोगायला लागते ती दंडाच्या स्वरुपात असली तर ठीक नाहीतर शिक्षेच्या स्वरुपात शारिरीक हानी, जिवहानी पदरात पडते तेव्हा आपण त्याल कारण ठरतो.

रस्ता हा सतत वाहता आहे. गाडया, पादचारी, दुचाकी, सायकल अन्य सगळया गोष्टी या अगदी कश्या गतिमान आहेत. कोणाची गती मंदावलेली, तर कोणाची अतिवेगाने, तर कोणाची रखडत असे असले तरी रस्ता हा आपल्याला जिथे जायचं आहे. तिथे पोहचवण्याचे काम करत असतो. रस्ता सुरक्षा हि एकटया दुकटयाने करायचे काम नाही त्याच बरोबर सरकारी अधिकारी आणि कर्मचारी फक्त यांची सुध्दा ते करायचे काम नाही. रस्ता सुरक्षा ही चळवळ आहे आणि त्यामुळे हि चळवळ अपघातमुक्त रस्ता असा निर्धार करण्याचा प्रयत्न सर्व स्तरांतून झाला पाहिजे. विद्यार्थी, पालक ,शिक्षक वर्ग या सगळयांनी या चळवळीत सामील व्हायला पाहीजे.

रस्ता सुरक्षा चळवळ ही लादलेली असू नये तर अगदी सहजतेने जीवाळयाने एकमेकांसाठी एकमेंकांच्या सुरक्षेसाठी केलेली चळवळ असायला हवी आहे. अद्यावत वाहने, लांब रुंद आणि चकचकीत रस्ते यामुळे वेगाची मर्यादा वाढली असली तरी सुध्दा ब्रेक दाबल्या नंतर जागच्या जागेवर थांबेल असे वाहन अस्तित्वात नाही. याचे कारण असे की, ज्या क्षणाला वाहन थांबते त्या क्षणी गतीला लगाम बसतो व त्याचा परिणाम हा वाहनात असलेल्या व वाहनांच्या आजूबाजूला असलेल्यांना नक्कीच भोगावा लागतो. त्यामुळे वेगावर नियंत्रण, नियमांचे पालन, कायदयाचे रक्षण आणि सर्वात आपण माणूस आहोत त्यामुळे माणूसकीचे लक्षण सोबत घेऊनच रस्ता सुरक्षा ही नित्यनियमाने पार पाडली पाहिजे. त्यामुळे आपली माणसं सुरक्षित राहण्यासाठी रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाने पाळायला हवी.

# With Best compliments from





# मी रस्ता बोलतोय ....

**श्रध्दा वझे**



रस्ते अपघातात एका प्रसिध्द सायकलपटूचा मृत्यू, दुरुस्तीसाठी खणलेल्या खड्ड्यात पडून दुचाकीस्वार महिला जागीच ठार, सर्वच महामार्गाची झालीय चाळण, श्वसनाच्या आणि मणक्याच्या आजारानं नागरिक हैराण... अशा आशयाच्या रोजच्या वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचून तुम्ही माझ्या नावानं दिवसागणिक बोटं मोडत असता तेव्हा मला काय वाटत असेल याचा विचार तरी करता का कधी तुम्ही?... माझ्या मित्रांनो?...

अरे चकित झालात काय?... हो मीच बोलतोय तुमच्याशी.. रोजचा तुमचा पायाखालचा रस्ता... आजवर खुप ऐकलं मी. तोंड दाबून बुक्कयांचा मार मुकाटपणानं सहन केला. मलाही मन आहे..भावना आहेत.. याची जाणीव तरी झाली का कधी तुम्हाला?... आता माझ्याही सहनशक्तीचा अंत होऊ लागलाय. तेव्हा आज ठरवलं की,तोंड उघडायचंच... खरं तर माझी ही अशी दुरावस्था व्हायला कोण जबाबदार आहे?.. सांगा बरं. रस्त्याला नाव कुणाचं द्यायचं? या साध्या प्रश्नावरूनही राडे करणारी तुमची मानवजातच आहे माझ्या या अशा मरणासन्न अवस्थेला कारणीभूत...

उन्हाळा असो वा पावसाळा, दिवस असो की रात्र. तुमच्या आजच्या भाषेत बोलायचं झालं तर 'टवेन्टी फोर बाय सेव्हन'

मी तुम्हाला अविरतपणे सेवा देत असतो... आणि तुम्ही? माझे ऋणनिर्देश करणं तर दूरच पण माझ्याप्रती साधी सहानभुती कृतज्ञता दाखवायलाही महाग झाले आहात. माझं 'मर्सि किलींग' करताय तुम्ही... म्हटलं थोडी धुगधुगी राहिली आहे अजून... तेव्हाच एकदा बोलून घ्यावं तुमच्याशी. थोडीफार माणुसकी शिल्लक असेल तर या कानपीळीनंतर तरी थोडाफार बदल होईल तुमच्यात... खोट्या आशेवर का होईना जगेन अजुन काही वर्ष...

माझा जीव कंठाशी आलाय तो फक्त आणि फक्त तुम्हा मनुष्यप्राण्यामुळेच. रस्त्यालगतच्या झोपडपट्ट्या, अतिक्रमणं, बेकायदेशीर पणे उभारलेले वाहनतळ, अवजडवाहनांची अखंड सुरू असलेली रहदारी, रस्त्यांच्या कडेला पसरलेले कचऱ्याचे ढीग, रस्ता अडवुन अनाधिकृतपणे बसलेले फेरीवाले, भटक्या कुत्र्यांचा, भिकारी गर्दूल्यांचा सुळसुळाट यामुळे मी अगदी मेटाकुटीला आलोय.



बेदरकारपणे अतिवेगानं जाणारे दुचाकीस्वार पाहिले की काळजाचा ठोका चुकतो. करकचून ब्रेक दाबणारे अतिउत्साही चारचाकी स्वार पाहून मला धडकी भरते. त्यामुळे हृदयरोग लागला आहे मला. अनेकदा रस्ते अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या रक्ताचे पाट माझ्या अंगावरून वाहतात तेव्हा त्यांच्या मरणानं आणि त्यांच्या न पाहिलेल्या कच्चाबच्चांच्या काळजीनं माझंही मन व्याकूळ होतं. आजच्या संगणकयुगातही एखाद्या लेकी-बाळीचा भररस्त्यात गावगुंडाकडून विनयभंग होतो किंवा निर्भयासारखी हृदयद्रावक घटना घडते. तेव्हा माझं रक्त घुसळून निघंत आणि त्या नराधमांविरूद्ध साक्ष द्यायला थेट न्यायालयात जावंसं वाटतं.

तुम्ही माणसांनी तर बेशिस्तपणे वागत माझ्या अंगावर पचापचा थुंकण्याचा निश्चय केला आहे जणु.. या वरून तुम्ही तुमची बुध्दी कुठेतरी गहाण ठेवल्याची मला खात्रीच पटतेय. क्रॉक्रिटचं जंगल उभारण्याच्या

नादात माझ्या अंगावर टाकण्यात येत असलेल्या डेबरीमुळे मी ढिगाऱ्याखाली गुदमरून जातोय. दुरूस्तीची कामं करताना, वाहिन्या टाकताना आजवर माझ्या अंगावर वारंवार शस्त्रक्रिया करण्यात आल्या. महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या देशात बोगदे, द्रुतगतीमार्ग, उन्नतमार्ग, भुयारीमार्ग तसंच मेट्रो, पुल उभारण्यासाठी तुम्ही माणसांनी माझ्या पोटावरच पाय दयायला सुरुवात केली आहे. दिवसें दिवस तुम्ही माणसांनी माझ्यावर टनावारी घाव घालत आहात. माझा कोथळाच बाहेर काढत



आहात. वाहनांच्या वाढत्या संख्येबरोबर वातावरणातल्या धुळ आणि धुरांच प्रमाण लक्षणीयरित्या वाढलंय. या वायूप्रदुषणामुळे माझा श्वास कोंडतोय. त्याच बरोबर रस्त्याच्या कडेला लघूशंका, शौच्च करणारे निर्बुध्द नागरिक, ओंसडून वाहणारी उघडी गटारं, पसरलेलं सांडपाणि, गाई-गुरांची विष्ठा यामुळे माझं शरीर घाणीनं बरबटून गेलंय कोंडवाड्यासारखी स्थिती करून ठेवली आहे. तुम्ही माझी.

पाऊस, पाणी, भुकंप, पूर या सारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये अनेकदा माझ्या सर्वांगाला तडे जातात तर कित्येकदा मला थेट जलसमाधीच मिळते. तुम्ही सध्या माझं अंग चिरून ठिक ठिकाणी जे पेव्हर, ब्लॉक्स बसवताय ना त्यामुळे माझं शरीर आता रफू केल्यासारखं झालंय. हे पर्यावरणाच्या दृष्टीने हानीकारक आहे. जमिनीत पाणी न मुरल्यानं माझ्या अंगाची लाही लाही होत असते. त्यातुनच माझ्या उरावर बसूनच तुम्ही मोर्चे काढता , आंदोलनं करता. अधुन मधुन होणाऱ्या दंगली, हत्या, जाळपोळ, मारामाऱ्यामुळे मला प्रचंड जखमा होतात ते घाव माझ्या जिव्हारी लागतात त्या आगीत मी होरपळून जातो. कधी काय होईल या दहशतीखाली जगतोय मी.

रस्तारुंदीकरणाच्या योजनांमुळे माझी लक्तरं वेशीवर टांगली जात आहेत. रस्त्यावरच्या ध्वनीप्रदुषणामुळे माझे कान अगदी विटून गेलेत. शहर सुशोभिकरणाच्या नावाखाली नव्यानं झाडं न लावता आहेत त्या झाडांच्या मुळांवरच तुम्ही घाव घालत आहात.

त्यामुळे प्राणवायूचा नैसर्गिक स्त्रोत नष्ट होतोय आणि त्या तळपत्या उन्हात माझं घर उघडं पडतंय यांच कोणाला काही वावगं वाटतंय का? हे कमी की काय म्हणुन देशसेवेचे, भक्तींच सोंग घेणारे मंडप उभारताना माझ्या अंगाला चक्क भोकं पाडतात. तर गावात कधी कुणी मंत्री-संत्री येणार असेल तर तात्पुरतं डांबर, खडी टाकून मला चटके देतात, माझ अंग भाजून काढतात. थोडक्यात काय मित्रांनो सुस्त प्रशासन, घोटाळेबाज अधिकारी, मतिगुंग झालेले सत्ताधिकारी आणि तुमच्यासारखे असंवेदनशील नागरिक यांच्या अभद्र युतीमुळे दिवसागणिक माझी लाज उघड्यावर पडतेय. मी म्हणजे तुमच्या हातातलं एक बुजगावणं झालोय.

माझं अस्तित्वच नष्ट करायला तुम्ही सक्रीय झाला असलात तरी तुमच्यातल्याच काही सुज्ञ आणि सुबुद्ध माणसांचा सहवास मला सुखावून जातो. विठूमाऊलीच्या ओढीने वारीतून जाणारे वारकरी विठूनामाच्या गजरात रमतात. भाविक बाप्पाची, दुर्गामातेची मिरवणुक काढतात. तेव्हा त्या जयघोषात मी भान हरपून जातो. माऊलीची पालखी अक्षरशः डोक्यावर घेऊन मिरवतो. मध्येच कधीतरी जुन्या मॉडेल्सची कार रॅली निघते ना तेव्हा तर मी माझ्या जुन्या ब्रिटीशकालीन वैभवात रमतो. तुम्हाला सांगतो मित्रांनो. त्यावेळी आपला देश पारतन्त्र्यांत होता पण रोजच्या रोज मला आंघोळ घातली जायची आणि आज स्वातंत्र्य मिळुन इतकी दशकं उलटून गेल्यावर सुध्दा माझं स्वास्थ काही केल्या सुधारत नाही. दिवसें दिवस मी खंगत चाललोय.

पण तरीही मॅरेथॉनमध्ये धावणारे तारूण माझी उर्जा वाढवतात. प्रजासत्ताकदिनाचं माझ्या अंगावरून जाणारं संचलन मी अभिमानानं पेलतो. कुणी कधी माझ्यावर देवी देवतांची खडूनं चित्र काढतो. जेष्ठ नागरिक दिवस उतरला की माझ्या आधारानं फिरायला निघतात. शाळा सुटल्यावर ती इवलीशी पावंल दुडू दुडू धावतात. एखाद्या संस्था- संघटनेचे सदस्य ठरवून माझी स्वच्छता करतात. माझ्या दोन्ही बाहुंवर वृक्षलागवड करतात, प्रभात फेरी, स्वागत यात्रा, फेस्टिव्हल सारखे सोहळे रंगतात. तेव्हा त्या आनंदोत्सवात मी पण न्हाऊन जातो.



आपल्या महाराष्ट्राची शान असलेली कोल्हापुरी चप्पल जेव्हा करकर आवाज करत जाते तेव्हा मी खूप खुश होतो. सामाजिक संदेश देणाऱ्या पथनाट्यात आनंदानं सहभागी होतो. एखादा चहावाला, रसवाल त्याच्या दुकानातला पहिला चहा किंवा पहिला उसाचा रस धरणीला देण्यासाठी मला पाजतो तेव्हा मी तृप्त होतो. दिवे लागणिच्या कातरवेळी धुप-अगरबत्तीच्या वासानं सुगंधित होतो. जीवाच्या आकांताने धावणारे चाकरमानी परतता तेव्हा मी त्यांची परतीची वाट होतो. तर माहेराच्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या एखाद्या नवपरिणित सासूरवाशीणिकडे पहात मी हेलावतो.

मित्रांनो निर्जिव वाटत असलो मी तुम्हाला तरी मी निद्रिस्त नाही. त्या टणक पृष्ठभागामागे माझं कोमल हदय आहे. म्हणुनच सांगतोय आता तरी स्वतःला शिस्त लावा. रस्ता म्हणजे नुसता वाहतुकीसाठी बांधलेले मार्ग नसून माणसाला माणसांशी जोडणारा हमरस्ता असतो. श्रध्दा की अंधश्रध्दा माहित नाही परंतू दारात बांधलेली लिंबू-मिरची तुम्ही रस्त्यावर टाकताना तेव्हा मनात येतं की वाईट नजरामुळे मलाच आता कुणाची तरी नजर लागली आहे की काय?



एरवी कुणाला चुकुनही पाय लागला तरी नमस्कार करणारे तुम्ही मला मात्र त्रिकाळ पायदळी तुडवत असता त्याचं काहीच वाटत नाही का रे तुम्हाला? एखादयाचा राग आला की तुम्ही म्हणता जा खड्ड्यात पण मी तर तुमच्या चुकांमुळे सपशेल खड्डयातच गेलोय त्याचं काय? तुम्हाला वाकड वळण लागलंय, तुम्ही वाममार्गाला लागले आहात. कावळा

गिधाडं, घुबड, डूक्कर यांना तुम्ही अपशकुनी म्हणता ना? पण तेच खरे माझे दोस्त आहेत. ते दिवस रात्र मला साथ-संगत करतात, माझी स्वच्छता करतात. पर्यावरणातील घाण काढून टाकतात आणि तुम्ही मानव? देवानं दिलेल्या दोन्ही हातांचा उपयोग या धरणीवर घाण टाकण्यासाठी करता. शक्तीशाली मेंदुचा वापर नाकरता कृतघ्नपणे पर्यावरणाला हानी पोहोचवता. तुमच्या या कृष्णकृत्यामुळे पशू-पक्षांपेक्षाही खालच्या पातळीवर घसरले आहात तुम्ही . येतंय का ध्यानात?

मेक इन इंडिया ची स्वप्न पहात देशात स्मार्टसिटीजचं जाळं विणलं जातंय त्या अंतर्गत मला नवनवीन रुप दिली जात आहेत. माझ्यावर कधी डांबर फासलं जातंय तर कधी सिमेंट उधळलं जातंय. आता तर काय मला प्लॅस्टिकचं नवं रुपडं दिलं जाणार आहे म्हणे, ,पण खरं सांगू मित्रांनो तुम्ही तुमच्याबरोबर मलाही निसर्गापासून तोडत आहात. कितीही प्रगती केलीत तरी आपल्या काळया आईशी असलेली आपली नाळ तोडू नका रे बाबांनो. आधुनिकीकरणाच्या फंदात मला जे चकचकीत अंगडं-टोपडं घालण्याचा तुम्ही घाट घालत आहात ना, त्यात माझ्या जिवाची कुतरओढ होत आहे. म्हणुनच पुन्हा पुन्हा माझं मन माझ्या जन्मदात्याकडे ओढ घेतयं. मातीचा रस्ता माझा बाप आहे. तर डोंगर-दऱ्यांतून जाणारी पाऊलवाट माझी माय आहे.

परदेशात जाता तेव्हा तुम्ही तिथल्या लांब सडक वेणीसारख्या काळ्याभोर गुळगुळीत रस्त्यांचं आणि दुतर्फा असलेल्या हिरवळीचं तोंडभरून कौतूक करता. पण पुन्हा आपल्या देशात आल्यावर 'येरे माझ्या मागल्या आणि ताक कण्या चांगल्या' ही मनस्थिती असते. पाश्चिमात्यांच्या नको त्या स्वैर आणि मुक्त जीवनशैलीचं तुम्ही अनुकरण करता. परंतू त्यांच्या आधुनिक तंत्रज्ञानांच आणि स्वयंशिस्तीचं अवलंबन करायचं नाही ना तुम्हाला. मग माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे. कृपा करून मला माझ्या आई-बापापासून तोडू नका. मला माझ्या मातीशी इमान राखू द्या.

सतत पुढे पुढे जाताना, मागे काही तरी सुटतयं याची मला आज प्रकर्षाने जाणिव झाली. म्हणुनच मी माझी मन की बात या शब्दप्रपंचातून तुमच्या बरोबर शेअर केली. माझी कर्मकहाणी वाचून, ऐकून तुमच्यात काहि बदल झाला तर ठीकच आहे, नाही तर माझ्यासह तुमचंही भवितव्य खडबडीत वाकड्या वळणांचं आणि खाचखळग्यांच असेल. तुम्हालाही आयुष्यातली अडथळ्यांची शर्यत पार करणं कठीण होईल हे निश्चित!

# अपघात एक भयानक समस्या

चारुलता कुळकर्णी

मानवी जीवनाच्या दैनंदिन गरजांची व्याप्ती अन्न, वस्त्र, निवारा ह्या पलिकडे ही वाढलेली आहे. गतीमान जीवन ही काळाची गरज आहे. काळ, काम, वेग हे सुत्र जगण्याचा आधार झालेला आहे. त्यामुळे वेळेशी जास्तीत जास्त जमवून घेणे आवश्यक झालेले आहे. गतीमुळे आर्थिक प्रगती झाली. पैशांमुळे हौस-मौज, सूख प्राप्त झाले हे जरी खरे असले तरी मनाला ताब्यात न ठेवता आल्यामुळे मानवी मर्यादांचा सगळ्यांना विसर पडत आहे. त्यातूनच रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

प्रत्येक अपघातात वाहन चालकांतच दोष असेल असे नाही. बहुतेक निरपराध जीव त्यात मृत्युमुखी पडतात. गेल्या काही वर्षापासून रस्त्यांवर मोटार गाड्यांचा जणू पुरच आलेला आहे. आपल्याकडे कोट्यावधी गाड्या आहेत त्यांत दरवर्षी लाखोंची भर पडत आहे. ह्या प्रगती बरोबर अपघात ही वाढू लागले. दरवर्षी हा अपघाताचा आकडा वाढत आहे. ह्यांत किती तरी निष्पाप जीव मृत्यूमुखी पडतात. हा व्यर्थ वाया गेलेल्या निष्पाप जीवांच्या नातेवाईकांना काय वाटत असेल? आयष्यभर त्या निरपराधी जिवांच्या निधनाने बिचारे होरपळून निगालेत. बहूतांशी अपघात याला एकच कारण नसून अनेक कारणे असतात. जसे वाहन सुस्थितीत नसणे, वाहन



चालक प्रशिक्षित नसणे जबाबदारीची जाणिव नसणे, पादचारांना वाहतूक नियमांचे ज्ञान व आकलन नसणे आपल्याकडे परवाना मिळविण्याची पध्दत खुप सदोष आहे.आपल्यापेक्षा आपल्यामागे असलेल्या श्रीलंका, नेपाळ या सारख्या देशांमध्ये सुध्दा परवाना मिळविण्यासाठी आपल्यापेक्षा अधिक कठीण प्रक्रियेतून जावे लागते. सिंगापूर , मलेशिया,चीन अशा देशांमध्ये सहा महिने कमीत कमी प्रशिक्षण घ्यावं लागते व त्यानंतर लेखी परीक्षा असते. एवढेंच नाहीतर परवान्यासाठी पुन्हां अर्ज करावा लागतो.

आपल्याकडे वहातूकीचे नियम न पाळण्याबाबत लोकांची असलेली मानसिकता घातक आहे. माझ्यामते केवळ २५टक्के लोक नियमांचे पालन करतात. २५ टक्के लोकांची नियम पाळण्याची इच्छाच नसते आणि उर्वरित लोकांची भावना त्यांनी नियम पाळले नाही म्हणुन मी का पाळायचे? अशी असते थोडक्यात काय नियम पाळणाऱ्यांना वेडे ठरविले जाते. कारण आपल्याकडील वहातुकीचे नियम तोडणाऱ्यांना होणारी शिक्षा खुप सौम्य असते . त्यांना होणारा दंड ते सहज भरू शकतात त्यांच्यावर कोणताच जरब नसतो. मदय पिऊन गाडी चालविण्याची संख्या सुध्दा मोठी आहे. अशा मद्यपी लोकांपूढे पोलिस यंत्रणा सुध्दा माघार घेते असं दिसून येत.

तासेच रस्त्यांच्या खराब परिस्थितीमुळे अपघात होतात गाडी खराब असल्यामुळे तसेच अपघातामागे सर्वात जास्त चुक ही चालकाची असते. दर दिवसाला मुंबईत गाड्या खरेदी करण्याचं प्रमाण जास्त आहे. खरेदी करतांना अजिबात विचार केला जात



नाही.

खरं तर काही लोक आपल्या खाजगी वाहनाऐवजी लोकलने प्रवास करू इच्छितात परंतू गर्दीतून ऑफिसपर्यंत जाईपर्यंत त्यांची होणारी अवस्था वेळेची किंमत, लोकलचे वेळोवेळी होणारे अपघात उशिरा येणाऱ्या लोकल, संप, लोकल समोर बसून करण्यात येणारे आंदोलन, तोडफोड ची वृत्ति त्यामुळे लोकलने न जाता ते लोक आपल्या खाजगी

वाहनांचा पर्याय स्विकारतात. त्यामुळे खाजगी वाहनांचा दर्जा सार्वजनिक वाहतूकीला मिळाला तरच हा प्रश्न माझ्या मते सुटू शकतो. तिकीटासाठी लांबच लांब रांगांवर काही उपाय करणे हे महत्वाचे आहे. माझ्यामते बससारखे तिकीट लोकल मधूनच उपलब्ध करून द्यावे.

वाहतूक व्यवस्था एकाच केंद्रित यंत्रणेमार्फत हाताळण्यांत यावी, पालिका, एम एम आर- डीए, राज्य सरकार अशा विविध यंत्रणेकडून हाताळली जाते त्यामुळे स्वतंत्र्य निर्णय आणि अंमलबजावणी करण्यांचे स्वातंत्र्य मिळत नाही.

आपल्याकडे पार्किंग धोरण योग्य नाही. पार्किंग दर खुपच कमी आहे. मोठ्या व लहान दोन्ही गाड्यांनाही तेवढेच दर लागू केले जातात. जे अत्यल्प असतात तसेच आपल्याकडे स्कूल बसची लांबी किती असावी हे ठरवून दिले असताना सुध्दा मोठ्या लांबीच्या स्कुल बसचे उत्पादन केले जाते. ह्याचाच अर्थ



चुकीच्या मार्गाने परवानगी मिळालेली असते.

वाहतूक सुरक्षा अभियान सप्ताहाच्या निमित्ताने वाहतूक सुरक्षा तज्ञ यांनी तरूण भारत च्या कार्यालयात भेट दिली. श्री




आशुतोष हे गेली १४ वर्षे वाहतूक सुरक्षा या क्षेत्रात काम करीत असून त्यांनी आतापर्यंत दोन लाखापेक्षा अधिकांना सुरक्षित वाहतुकीबद्दल प्रशिक्षण दिले. त्यांच्या रस्ता सुरक्षे बाबत बनविलेल्या बेस्ट रोड सेफ्टी फिल्म ॲवार्ड मिळाला आहे. वाहतूक सुरक्षेचे धडे शालेय अभ्यासक्रमांत बंधनकारक करावे असे मत वाहतूक सुरक्षा तज्ञ श्री अत्रे यांनी दिले.

सिंगापुरला मी प्रत्यक्ष पाहिंल असता असं आढळलं की, तिकडे वेगावर नियंत्रण आहे. अधिक वेगाने गाडी चालवल्यास लगेच शिक्षा होते. तसेच रस्ते कोठेही ओलांडू शकत नाही या उलट आपल्याकडे मोकाट गुरांप्रमाणे कोठेही रस्ता ओलांडणारी माणसं हॉर्न

वाजवल्यावरही जागची न हलणारी माणसं ह्यामुळे पण अनेक अपघात होतात.

नियम हे पाळण्यासाठीच असतात. अधिकांश अपघात हे गाडी नशेत चालवल्या मुळेंच होतात. तसेच मुलांनी गाडी चालवू नये. माझ्या मते मोटार वाहन ही एक भयानक समस्या आहे, जी आपल्या जीवनांत विषही कालवू शकते. म्हणुनच अपघात टाळण्यासाठी वाहन चालवतांना जागरूक असणे मनावर आणि वेगावर ताबा असणे, नियमांचे पालन करणे हे सगळ्यात गरजेच आहे. यासाठी दक्षता व सावधगिरी हेच उत्तम उपाय !

शेवटी एक गोष्ट प्रत्येकानेच लक्षात ठेवावी की माणसाचा जन्म एकदाच मिळतो. तो अपघातामुळे अवेळी कोमेजू नये, खुडला जाऊ नये याची काळजी प्रत्येकाने लक्षांत घेतली पाहिजे.

❃❃❃

**घोषवाक्य**

**सुरक्षित नियमांचे अनुकरण,**
**करी सुरक्षित आपुले जीवन**

# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था**





# रस्त्याने जाताय सावधान

वैजयंता साळवे




आताच्या रस्त्यांची एवढी दयनीय अवस्था झाली आहे की .. .. म्हणावं लागतं -''ए भाय जरा देख के चलो आगे भी खड्डा है,पीछे भी, दाये भी खड्डा है, बाये भी उपर नही लेकिन नीचे भी!'' अशीही रस्त्यांची अवस्था पाहून मनात असा प्रश्न येतो की आपण चंद्रावर चालतो कि काय? गेल्या वर्षी एक मुलगा बाइक खड्डात पडून जागच्या जागी ठार झाला. मुलगा गेल्याचं दु:ख बाजुला ठेवून त्याच्या वडिलांनी दुसऱ्या मुलांना किंवा कोणालही अशा प्रकारे मरण येवू नये म्हणून स्वत: रस्त्यावर खड्डा दिसला कि तो बुजव, खड्डा दिसला कि बुजव अशी स्कीम चालू केली त्यासाठी तो स्वतः गोणीतून साहित्य घेऊन यायचा बिचारा! किती निरपराध जीव जातात या खड्डातून.

रस्त्यावरून जाण्याचे काही नियम आहेत. डाव्या हाताने चालणे वगैरे. पण आता डाव्या हाताने चाला की उजव्या हाताने . बाइक वाले एवढे जोरात जातात कि माणुस आता खरोखरच कधीही बाइकच्या धक्क्याने पडु शकतो. मला तर खुप भिती वाटते. घरातून बाहेर पडल्यापासून घरात येईपर्यंत मी घरात सुरक्षित

येईल ना? याची शाश्वती नसते.

एकदा मी कामानिमित्त सकाळी साधारणत: पावणे आठ, आठच्या सुमारास रस्त्याने जात होते. त्या वेळेस एक घरकाम करणारी बाई असावी. तिच्या हातात कापडी पिशवी आणि मोबाईल आणि पैशांच पाकिट असाव्यात. एक बाईकवाल त्या स्त्रीच्या जवळुन जोरात धडक देऊन निघुन गेला. ति बिचारी डोक्यावर पडली. डोक्याला मोठी खोप (थोडंस डोकं फुटणे) रक्त जोरात वाहू लागलं, ती भितीने एकदम गोंधळून गेली, आजूबाजूचे लोक, दोन तीन बायका आल्या मी त्यांना सांगितलं तिच्या नवऱ्याच्या नंबरवर आपण फोन करूया ! फोन लागल्यावर तो ही बिचारा अपघात ठिकाणी आला. पण त्याच्या जवळ पैसे कुठले? बिगारी काम करत होता बिचारा आम्ही जमलेल्यांनी काही पैसे देऊन आम्ही बायकांनी त्यांना सरकारी दवाखान्यात नेले उपचार घेऊन त्यांना घरी पाठवलं. त्याच्या रोजंदारीचे पैसेही बुडाले आणि भयानक मानसिकत्रास आणि ताण ही सोसावा लागला बिचाऱ्यांना! तो बाईकस्वार मस्त निघून गेला.

दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात आर.टी. ओ. कडून रस्ता सुरक्षा सप्ताह पाळला जातो पण तेवढ्या पुरतीच. नंतर वहातूकीचे नियम सगळे धाब्यावर बसवतात. प्रगतीशील भारत निर्माण व्हायला असेल तर तरुणांमध्ये जागृती निर्माण व्हायला हवी असे मला वाटते.

✽✽✽

**सुरक्षा अभियान ट्रस्ट** ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था




Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!

तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!



# रोड सेफ्टी - रस्ता सुरक्षा

**शुभांगी घाग**

**"पावसाळा संपला पण .. ..**
**पिर् पिर् पिर् पिर् पावसाची**
**त्रेधां तिरपिट सगळ्यांची**
**रस्त्यांवर मोटार गाड्यांची**
**शर्यत लागली पोहायची"**

अशा या रस्त्यांची सुरक्षा आपण करायलाचं पाहिजे. कारण आपण पाहतोय सध्याचा काळ हा रस्त्यावर होणाऱ्या अपघाताचा आहे. संध्याकाळी टी.व्ही. वर थरकाप उडवणारी दृश्य तर सकाळी पेपर उघडल्यावर अस्वस्थ करणारे मृत्यु वाचायला मिळतात. कधी लग्नाच वऱ्हाड असतं तर कधी नवपरिणीत जोडप तर कधी कधी तान्हबाळ. त्याने अजून डोळे उघडून जग ही पाहिल नाही. कधी -कधी वाटत मृत्यू परवडला पण आयुष्यभर सोबतीला असणार अपंगत्व नको.




हे रस्त्यावरचे अपघात टाळायचे असतील, प्रवास अपघात विरहीत व्हायचे असतील तर सुरक्षित वाहन कुशल व संयमी वाहक आणि उत्तम रस्त्यांची आवश्यकता असते.

आजच्या तरुणीकडे पाहिले तर असे वाटते की, अठरावे वर्ष कधी लागतयं आणि आपण दुचाकी चारचाकीचे परवानाधारक कधी होतोय. हे स्वातंत्र्य मिळाले की त्यांना वाटते आपण आता फ्री बर्ड आहोत. मोठ्यांच्या धाकातून सुटका मिळाली. यासाठी आपण आता शास्त्रशुध्द शिक्षण घेतलं पाहिजे. आर.टी.ओ.ची परिक्षा चांगल्याप्रकारे उत्तीर्ण झाली पाहिजे ही गोष्ट त्यांच्या ध्यानीमनी नसते.

हातात वाहन येताच मग रात्रीच्या पार्ट्या, नवतारूण्याची झिंग, वाऱ्याशी मस्ती-स्पर्धा, सोबत मागच्या सीटवर मैत्रिण अशावेळी मृत्यू कुठे दबा धरून बसला आहे हे कळत नाही. २०१५ मधे ५लाख रस्त्यावरच्या अपघाताला बळी पडलेल्या लोकांची संख्या ऐकून हदयाचे ठोके वाढले. यासाठी रस्ता सुरक्षांचे काही नियम सांगावेसे वाटतात.

१)सर्वात प्रथम सांगावेसे वाटते ड्रायव्हींग करतांना मोबाईलवर बोलू नये.




स्टॅंडला मोबाईल असला तरी बोलु नये कारण आपला फोन आपले मन-लक्ष वेधून घेतो.

२)कायम सीटबेल्ट लावलेला असावा.

३)कुठलेही मदय प्राशन करू नये.

४)मुल बरोबर असतांना गाडी हळू चालवावी.

५)मुलांकडे दरवाजे चाइल्ड लॉक असावे.

६)मुलांनाही सीट बेल्ट असावे.

७)पुढच्या सीटवर बसणाऱ्या प्रत्येकाने सीट बेल्ट लावाला जरी पोट मोठे असले तरीही.

८)पोलिसांना बेल्ट लावल्यासारखा दिसावा म्हणुन तो कमरेपाशी हातात पकडून ठेवू नये.

९)मागच्या सीटचे बेल्ट नवीन कव्हर्स घालताना दडपून टाकू नये.

१०)रस्त्यावर खेळू नये.

११)शाळे जवळच्या रस्त्यावरून जातांना गाडीचा वेग कमी असावा.

१२)मुलं किंवा वयस्कर समोरून जातांना दिसली तर यासाठी दुरदृष्टी ठेवावी.

१३)मुलांना ट्रफिक सिग्नलची माहिती करून द्यावी.

१४)रस्त्यावरून चालतांना कानाला हेडफोन लावून चालू नये. फोनही घेऊ नये.

१५)रस्त्यावर सगळीकडे साईन बोर्ड असावे. स्पीड बोर्ड असावे.

१६)टू व्हीलर वर हेल्मेट सक्तीचे आहे पण तरीही मुले वापरीत नाहीत.

१७)टू व्हीलर दोघांसाठीच असावी.

१८)गाडीतील माणसांची संख्या

किती असावी हे ही ठरलेले असावे.

१९)रस्ता सुरक्षेचे कायदे सगळ्यासाठी कडक शिस्तीचे झाले पाहिजेत.

२०)रस्त्याची आखणी करतांना इंजिनियर आणि कॉन्ट्रॅक्टर यांनी एकमेकांच्या मतांची देवाण-घेवाण करणे आवश्यक आहे.फारच नियमावली वाढली. अशी अजूनही खुप कारणे आहेत. आपणही ती शोधू शकता. नवीन गाडी घेतांना तिचं रंग- रूप पाहतो,सुखसोई,पुर्नविक्रीची किंमतही पाहतो. या बरोबर आपण हे ही लक्षात ठेवले पाहिजे की, दर पाच वर्षांनी परवान्याचे नविनिकरण झाले पाहिजे. वैद्यकीय सर्टीफिकेट खरी असावीत. जो मुद्दा अठराव्यावर्षी तोच साठी नंतरही कारण वाढत्या वयानुसार दृष्टी अंधुक झालेली असते. भारतात आपण म्हणतो खुपच उजेड आहे. मग का हवे DRL दिवसाउजेडी प्रकाशमान असणारे दिवे? DRL मुळे आपले वाहन पादचाऱ्यांच्या आणि इतर वाहकांच्या चटकन लक्षात येते. पादचारी, मागचे वाहन,बाजूची वाहने यापासून अंतर ठेवण्यासाठी इंडीकेटर्स अलार्म्स हवेत. पावसाचे थेंब काचेवर आल्यास वायपर्स चालू हवेत, हायवेवर वाहकाचा डोळा लागू लागल्यास चहा-कॉफीची सुचना गाडीने करावी.

आता आपण दुसरी बाजूही पादचारी लोकांची पाहुया ! यांनी लक्षात ठेवावे रस्ता क्रॉस करतांना काळ्या पांढऱ्या पट्ट्या शोधून रस्ता क्रॉस करावा. पादचारी पुलांचा वापर करावा. सिग्नलचे नियम पाळावे तसेच सरकारनेही रस्ता प्रशस्त, खड्डेविरहीत अन प्रकाशमान ठेवावेत. आज भारतात रस्त्याचे अपघात मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यासाठी गरज आहे आपण सगळ्यांचाच प्रामाणिकपणाची, दृढनिश्चयाची आणि इतरांचा विचार करण्याची सहिष्णुता हवी !!

आता येता.. .. येता.. ..जाता- जाता .. .. म्हणुया

**"रस्ता सुरक्षा नियम पाळुया**
**सारे मिळुन देशाभिमान ठेवूया"**



# With best compliment from

PRIEST
PHARMACEUTICALS

# gLacier

## Pharmaceuticals Pvt.ltd.

**Prop-Ashok Nanwani**

---

**G-5, MIDC INDUSTRIAL, AREA ,**
**AMARAVATI**
**Phone No.0721 2520299**

# रहदारी व्यवस्थापनाशी तडजोड म्हणजे मृत्युशी जोड

**निलेश बामणे**

मुंबईत रस्त्यालगत अनाधिकृत जागेवर असणारी अनाधिकृत मंदीरे महानगर पालिकेने उध्वस्थ केली. तसे करण्याला भक्तांनी विरोध केला, काही लोकांना हा धर्मावर केलेला आघात वाटला, त्यातील काही मंदिरे जागृत वैगरे होती, पण ती मंदीरे विनाकारण तोडायला महानगरपालिकेला वेड लागलय! ती सर्वच्या सर्व मंदीरे अनाधिकृत जागेवर अर्थात रस्त्यावर असल्यामुळे सहाजिकच त्याच्या असण्याचा रहदारीवर परिणाम होत होता त्या मंदिरापूढे दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागत होत्या तर काही भक्त मंदिरा बाहेरील जागा आपल्याच मालकीच्या समजून तिथे गाड्या पार्किंग करत होते कित्येकांनी पुजेच्या साहित्याची बाजूला अनाधिकृत दुकाने थाटली होती त्यामुळे रस्त्यावरील रहदारीवर त्याचा परिणाम होत होता छोटे मोठे अपघात होण्याची शक्यता अधिक होती. रस्त्याच्या रुंदीकरणात अथवा रस्त्यात जे काही अनाधिकृत आडवं येणार ते दुर करण क्रमप्राप्त असताना एखाद मंदीर ते मंदीर आहे म्हणुन अपवाद कसं ठरू शकत? धार्मिक, सांस्कृतिक, पारंपारिक अथवा जत्रेच्या नावावर आपल्याकडे वर्षभर कोठे ना



कोठे मिरवणुका, पालख्या वगैरे काढल्या जात असतात. त्याचा किती भयंकार परिणाम रहदारीवर होतो याचा कोणी विचारच करत नाही. आपल्या देशात कित्येकदा आपल्या पोलीस खात्याची कार्यक्षमता फक्त रहदारी नियंत्रणावरच वाया घालविली जाते. लग्नाची वरात बऱ्यांदा रहदारीचा खोळंबा करते अनियंत्रित वरात आणि त्या वरातीतील अनियंत्रति लोक कधी कधी अपघाताला आमंत्रण देतात. बऱ्याचदा या वरातीत रहदारीचे नियम धाब्यावरच बसविले जातात. धार्मिकता ठीक आहे पण धर्मात रहदारीच्या



व्यवस्थापनात मोठी अडचण ठरते हे दुर्लक्षित करून चालणार नाही... अजून किती दिवस आपण धर्माच्या अथवा संस्कृतीच्या नावावर रहदारीच्या व्यवस्थापनाचा बळी देत राहणार आहोत? हा प्रश्न प्रत्येक सुजाण नागरिकाने स्वतःला विचारायला हवा. मध्यंतरी एका पोलिसांचा रस्त्यात अपघात झाला असता त्याला लोकांनी वेळीच मदत न मिळाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला किती भयंकर आहे हे? तर काही अपघात प्रसंगात लोक अपघातग्रस्तांना मदत करायची सोडून सोडून सेल्फी काढण्यात धन्यता मानतात. रस्ते अपघातात हल्ली हे सेल्फीचे आणि वाहन चालविताना मोबाईलवर बोलण्याचे वेड बऱ्याचदा कारणीभुत ठरत आहे. रस्ता ओलांडताना अथवा रस्त्यावरून चालताना मोबाईलवर बोलत चालणे हे ही रस्ता अपघातात भर घालत आहेत. मुंबइत तर लोक बसमध्ये चढता चढताही मोबाईलवर बोलत असतात. रस्ता हा चालण्यासाठी तो हडप करण्यासाठी अथवा आपल्या व्यवसायात उपयोगात आणण्यासाठी नसतो. देशातील कित्येक शहरात फुटपाथ हे चालण्यासाठी

असतात याचाच विसर पडलेला दिसतो मग अनावधानाने जरी अपघात झाले तरी शेकडो लोक जखमी होतात कित्येक आपले प्राणही गमावतात. रस्ते अपघात होऊन निरपराध लोकांचे रक्त सांडल्यावर जाग होण्यापेक्षा अगोदर रहदारीचे व्यवस्थापन चोख केले आणि त्याच्या आड येणारे अगदी मंदीरे सुध्दा जमीनदोस्त करायला कोणाचीच काही हरकत नसावी.

ईश्वर सर्वव्यापक आहे त्याच्या मंदीरामुळे त्याच्या भक्तांना झालेला त्रास त्यालातरी कसा बरं सहन होईल?लोकांच्या सुरक्षेशी तडजोड करणे योग्य नाही अगदी देवासाठीही !

कित्येक देवळात आपण हल्ली देवालाच नारळ हार तपासून घेऊन आत जातो ना? हे कोणाच्या सुरक्षेसाठी देवाच्या कि आपल्या? आता प्रत्येक सुजाण नागरिकाने एक बिद्र वाक्य लक्षात ठेवायला हवे...

रहदारीच्या व्यवस्थापनाशी तडजोड म्हणजे मृत्यूशी जोड.

## घोषवाक्य

मी जो पर्यत आहे
गुपचाप छान झोपून
सुरक्षित कामाची पध्दत
तो पर्यंत घ्या शिकून
कशाला देता तुम्ही
माझ्या शेपटीवत लाथ
मी आहे अपघात ..

काम तर करावंच लागतं
रोजी रोटी साठी
काळजी घ्या जीवाची
बांधा शेंडीला गाठी
बायका पोर राजेहो
वाट बघतात घरात
मी आहे अपघात



# लक्ष्मी सर्जिकल अँड फार्मा

लक्ष्मी सर्जिकल्स अँड फार्मा हि कंपनी हॉस्पिटल्समध्ये, प्रामुख्याने ऑपरेशन थिएटरमध्ये लागणारी उत्पादने व सेवा देणारी कंपनी असुन या क्षेत्रातील सुमारे २० वर्षांचा यशस्वी अनुभव पाठीशी आहे. आय. एस.ओ. प्राप्त आमची कंपनी फक्त गुणवत्तापूर्ण उत्पादनेच पुरवित नाही, तर उत्पादने स्थापित केल्यावर (system installation) केल्यानंतर हाताळणी करणाऱ्यांना योग्य आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनही – प्रशिक्षणही देते. ज्यामुळे संबंधितांना हाताळणी करणे आणि देखभालही सहज शक्य होते. उत्कृष्ट सेवेमुळे खाजगी तथा सरकारी क्षेत्रातील असंख्य ग्राहकांची "लक्ष्मी सर्जिकल्स अँड फार्मा" प्रथम पसंती ठरत आहे.


मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर


ऑक्सीजन जनरेटर प्लांट


मॉड्यूलर ICU


मेडिकल गॅस पाईप लाईन सिस्टीम


360 डिग्री फॉगर मशीन


मोड्युलर लेबर रूम


व्हिडीओ लैरिंगोस्कोपी


कमर्शिअल लाँड्री सिस्टीम


शॅडोलेस ओ.टी. लाईट (LED)

जे-१/सी,महावीर नगर, एम.पार्क, विकास दूध फेडरेशन जवळ, महावीर नगर, जळगाव, महाराष्ट्र-४२५००१



# आपण हे करुया?

श्रीप्रकाश सप्रे

आजकाल रोज वर्तमानपत्र उघडले की किमान ३/४ बातम्या या अपघाताच्या असतातच. त्यामध्ये देवदर्शनाला जाताना/परतताना पार्टीहून येताना, ट्रिपला जाताना येताना अशा विविध प्रकारच्या कारणाने हे अपघात घडलेले असतात. या मध्ये जवळजवळ ९५% अपघात हे स्वतःच्या (ड्रायव्हरच्या)चुकीने घडलेले असतात. काही मस्तीत, नशेत आणि मुख्य म्हणजे वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवून घडतात.

आपल्या येथे रस्ते सुरक्षा मंडळ आहे. वाहतुकीचे नियम आहेत याचा अभ्यास करून सावध राहून वाहतुकीचे नियमन केले तर अपघाताचे प्रमाण निश्चितच कमी होईल. साधे साधे नियम सुध्दा आपण पाळत नाही, दुलर्क्ष करतो. काही उदाहरणे पाहू.

शाळांच्या रिक्षा या मुख्य मुलांची ने-आण करण्यासाठी आहेत. कायद्याने त्यांना मुलांची संख्या ठरवून दिली आहे. पण रिक्षावाल्यासकट, वाहतूक पोलिस सुध्दा दुर्लक्ष करतात आणि घडू नये ते घडते. आज मुलांची जबाबदारी आपल्यावर आहे याचा विचार करत नाहीत. भरमसाठ मुले भरणे, त्यांची दप्तरे रचणे ती रिक्षांच्या बाहेर येतात व वाहतुकीला अडथळा येतो.

हेल्मेट सक्ती ही सध्या आहेच पण हे



कोण पाळतो? शरिराचा महत्वाचा अवयव डोक आहे. त्याला मार बसून ते फुटू नये म्हणुन हेल्मेट आवश्यक आहे. पण कोण लक्षात घेतो? आपण काही वेळा पेपरमध्ये वाचतो की हेल्मेट नसल्याने डोक्याला मार लागला व खल्लास झाला. यामुळे हेल्मेटचे महत्व किती आहे याचा प्रत्यय येतो. याबद्दल जागृति केली जाते पण व्हायचे ते होतेच.

नो एन्ट्री चा बोर्ड आपण सर्वत्र पाहतो पण तिकडे दुर्लक्ष करुन वेडीवाकडी वाहतूक चालू असते. यामुळे अपघातसुध्दा होतात.

वन वे चा पण बोर्ड असतो त्याकडे ही दुर्लक्ष करून उलटी कडून वाहतूक चालू असते. आपण व्यवस्थित जात असतो पण उलटीकडून येणारा माणुस इतका जोरात असतो की आपलीच काहीतरी चुक आहे असे घटकाभर वाटते. अशा वेळेस मी त्या येणाऱ्या माणसास फक्त मागे पोलिस असल्याचे सांगतो जेव्हा तो गाडी मागे वळवतो व आला तसा जातो. पण काही जात नाहीत निगरगट्ट तसेच जातात. पण प्रत्येकाने चुकीच्या रस्त्याने येणाऱ्याला पोलिसा बद्दल सांगितले तर वाहतुकीला योग्य मदत केल्याचे समाधान मिळेल.

सिग्नल न पाळणे याबद्दल कोणत्याही चौकात आपण गेलात तरी पाहता येईल. हिरवा दिवा लागायच्या आत काहीजण गाडी स्पीडमध्ये पुढे दामटतात. आपण प्रामाणिकपणे उभे असतो पण हे महाभाग मागून जोरजोरात हॉर्न वाजवत असतात पोलिसांत देखत हे चालू असते अशा वेळेस समोरून कोणी तसाच आला तर समोरासमोर धडक व्हायची भीती असतेच.

हायवेवर अपघाताचे प्रमाण खुप असते. हायवेवर स्पीडला महत्व आहे तसेच वेगवेगळे ट्रक्स असतात परंतू तिथे सुध्दा लेनची शिस्त न पाळल्याने अनेक अपघात घडतात.

सहसा रात्री १२ ते ४ पर्यंत प्रवास करू नये साखरझोपेची ही वेळ असते. याच वेळेमध्ये सर्वाधिक अपघात होतात. हे सर्व बघता वाहतूकीचे नियम हे सर्वांनीच पाळायला हवेत. शासनाचे याबाबतीत अभियान चालू आहेच. परंतू आपण सहकार्य करायला हवे.

वाहतूक पोलिंसाना सहकार्याची अपेक्षा आहेच हे अभियान सर्वांसाठीच आहे अशी भावना हवी.

हे जर मनात आणलं तर अपघातांचे प्रमाण खुपच कमी होईल आणि कांही दिवसांनी नगण्य राहील तो दिवस दुर नाही ही अपेक्षा!

**पाळुन वाहतूकीची शिस्त।**
**आपले आयुष्य जगा मस्त।**
**वाहतुकीची एकच शान।**
**रस्ते सुरक्षा अभियान।**
**डोक्यावर घाला हेल्मेट।**
**नाहीतर होईल चेकमेट।**



# रस्ते रहदारी वाहतूक

भालचंद्र काळे

डोंबिवली येथील एका वर्दळीच्या रस्त्यावर अगदी खुशालपणे, जणु येथे गाड्या वगैरे काही वहाने अजिबात नाही आहेत आणि ह्या बाई अगदी रस्त्याच्या मध्यभागा मधून अगदी सेंटर गाठून चालत आहेत त्या काही विशेष गप्पामध्ये मग्न आहेत, दोन चाकी वहाने त्यांना कसे बसे चुकवित आहेत त्या बाईंना त्याची काही कल्पना नाही. चालता चालता त्यांनी एकदम दिशा बदलली, कडेने




चालावेसे वाटले, त्याचवेळी एक मोटार सायकलवाला त्यांना चुकवत चुकवत आत सरळ निघून जाण्याचा विचार करत होता, गाडी सरळ घेतली आणि ह्या मॅडम त्याच्यासमोर पाठमोऱ्या, त्याने ब्रेक दाबला तरी मॅडमच्या लक्षात नव्हतचं त्याने फक्त म्हटलं काय मॅडम, मॅडम मात्र तोऱ्यात त्याचीच चुक धरून ओरडल्या, दिसत नाही का, चष्मा लावून घ्या, आवाज खुप तिव्र होता. कारण नसतांना मॅडमच जोरदार भाषण , शेजारून एक गृहस्थ जात होते त्यांनी हा सारा प्रकार पाहीला होता ते म्हणाले आहो बाई, तुमचीच चुक आहे मान्य करा तुम्ही थोडे थांबला असता तर हे गृहस्थ सरळपणे गाडी नेऊ शकले असते त्यावर त्या सभ्य गृहस्थाचे म्हणणं त्या बाईंना पटलं, त्यांची चुक समजून बाई सरळ निघाल्या.

वरील गोष्ट जसे जाणारे येणारे करतात तसे चालक सुध्दा तिच चुक खुप वेळा करता जास्त करून पोरगट किंवा उत्साही मुलं असंच वागतात. प्रत्येक चालकाला स्वतःची अशी शिस्त हवी असते आणि हवीच कायद्याचे धडे वेगळे पण काही गोष्टी मानसिक शिकवणीच्या हव्या तसा स्वभाव हवा, गाडी, रस्ता, मौज मजेसाठी नसतो घाई असते पण सर्वानाच शिस्त असेल तर घाईच निराकरण होऊ शकते. गावातून रहदारी खुप विचित्र असते कुणास कसे, कुठे वळायचे, पोहोचायचे ह्यांच काहीच समोरच्याला माहित नसते. गाडी चुकवित चुकवित जाणारा तितकाच

अनुभवी असावा लागतो किंवा अनुभवी माणुस सुध्दा असाच चुक करू शकतो एखादा गाडीसमोर थोडक्यात चुकामुक करतो, समोर चुकीच्या वागणुकीमूळे चालकांच्या हृद्याची धडकन वाढवली जाते. झेब्रा क्रॉसिंग प्रत्येक वेळी समोर असेलच असं नाही जाणारे जात येत असतातच अर्थात काही गोष्ट घाईमुळे घडतात.

काहींना पक्क माहित असत की, रस्त्यावर गेल की येणारा वाहन चालक अंगावर गाडी न घालता ब्रेक लावेल पुढे जायला हरकत नाही पण हा खेळ बाधक, ठरू शकतो अर्थात काळजी सर्वच घेतात. वाहतूकीत अनेक गाड्या आपल्या स्थानकावर पोहोचण्यासाठी शक्यतो स्पीड घेतात.

पोलिस नियंत्रण फार कठीण आहे. दिशा आणि वहाने ह्यांचा मेळ साधण, रहदारीच्या रस्त्यावर तसेच मोठी वहाने, रिक्षा, दोन चाकी गाडया, हातगाडीवाले आणि मध्येच थबकणारी माणसे हयांचा गुंता कमालीची अडचण करित असतो.त्यातून काही घाईची वहाने हळु हळु मार्ग क्रमित स्पीड वाढवित निघून जाण्याच्या तयारीत असतात. शिट्टी वाजत असते. घाई चालू असते, ताळमेळ बसत नसतो तरी वहातूक थांबवू शकणार नसते, कुणाला सांगणार ती वेळ विचित्र असते, शिस्तिसाठी रस्त्यात मार्किंग असते, पार्टीशन असते. कुठे जाळिचे तर कुठे मध्ये भिंती बघून , तरीही त्या मधुन, वरुन लोक घुसत असतात कारण ते मध्येच अडकतात काही लोक धाडसही करीत असतात.

रस्त्यावर फुटपाथ एकतर त्यावर चेंबरचे खुले झाकण- खड्डे असतात की मुलासह जाणाऱ्या व्यक्तिला धास्ती वाटते की कुणा मुलांच लक्ष नसले तर अनर्थ घडायचा, परत फुटपाथ म्हणजे विक्रेत्यांच हक्काच स्थान की रोजी रोटी साठी सरकारनीच त्यांची सोय करून दिली असं त्यांना वाटत असत त्यामुळे कुणी त्यांच्या बाबतीत बोलत पण नाही इतकंच नाहि तर जाणारे येणारे त्यांच्याच कडून भाजी, फळे, इतर वस्तू घेण्यास विसरत नाहित. आणि जाणाऱ्या येणाऱ्यांना त्यांच्यामुळे काहीच बिघडत नाही. सोय होते, काही वेळा रहदारीसाठी लवकरात लवकर आपल्या जागी पोहोचण्यासाठी रोडचा वापर केला जातो. गल्लीबोल्यातून गेलेले रस्ते असतात पण वेळ नसल्यामुळे मुख्य रस्ता वहानानांही बरा वाटतो. पण त्या मुळे रोड पुरेपुर पॅक होत रहातो, वाहन कोंडी होऊ शकते.

हल्ली तर ट्राफीक जाम हा मुद्दा सगळीकडेच रस्त्यांना लागू पडतो, वहाने भरपूर, लोकवस्ती भरपूर त्यामुळे असे घडणे स्वाभाविक असते त्यावर तोडगा कठीण त्याच नियंत्रण ट्राफिक हवालदारच जाणे पर्यायी अनेक रस्ते तयार होत आहेत. त्याचा वापरही होतो आहे पण तरी देखील कोंडीसुटू पहात नाही . अडचणी अनेक आहेत.

अगदी गावा गावात रस्ते तयार आहेत पण वहानेच भरपूर असल्यामुळे पार्किंग चा प्रश्न सुध्दा अवघड होतो आहे. वहाने अत्यंत महत्वाची

आहेत वहातूक त्यांच्यावरच अवलंबून आहे. घाईच्या गोष्टी तितक्याच लवकर पोहोचविणे हे गरजेचे आहे. त्या घाईतच ट्राफिक जाम होते आणि वेळ दवडला जातो.

सणवार असेल तर त्यांची मर्यादा विचारात घेणे कठीण आहे. कारण नातेवाईक, भेटीगाठी आणि मालवहातूक किंवा साजरी करण्यासाठी स्वतःच्या गाडीने जाणारे असंख्य आहेत. त्यामुळे अर्धा तासासाठी एक ते दोन तासा वेळ ट्राफिकसाठी जातो. मग आपल्या स्थानावर जाणे होते. ट्राफिक जशी लांब पल्ला अडवित रहाते तासोचा गांवात रहदारीसुध्दा अडचणी करीत असते, अगदी रस्त्याने दुकानदारांच्या शोरूम चढून मिळेल ती वाट साधून इतकी गर्दी पार करित लोक पुढे सरकत असतात. त्यांत रस्त्यातच भाजीवाले, वस्तूवाले, कपडेवाले (स्वस्त कपडे विक्रेते) त्यांचीतर हक्काची जागा असते ती अगोदरच त्यांनी काबीज केलेली असते. त्यात भर म्हणजे मध्ये मध्ये खोदकाम केलेले खड्डे, त्या जागा एक एक वर्ष झाले तरी कामे चालूच असतात फक्त थोडीफार जागा सुटलेली असते, खड्ढे ही पुढे मागे खोदकाम करीत काम चालू असल्याने दाखवित असतात, कोण कुणाला सांगणार लोक सर्कस करित चालत असतात,सामान्य जन त्यांचा संबध इतकाच की स्वतःची सुटका करित पुढे चालणे हा. घरी आल्यावर शेजारी मात्र काय खोदकाम केलंय चालणे मुश्कील होऊन बसलयं असं गप्पामध्ये बोलण होत त्याला शेजारी होकार देतात. त्या पुढे काही नाही. स्वतःच्या व्यापात गुंतलेली जनता, पुढे काहीच करू शकत नाही.कुणाला सांगणार कोण बुजवणार खड्डे, नगरसेवक काम चालू आहे त्यांना पुर्ण करावच लागेल अशी उत्तर देऊन मोकळे होतात गप्प रहाण्या पलिकडे काहीच करू शकत नाही.




पावसामुळे खाच खळगे पडतातच, रोडची गॅरंटी कुणी द्यावी, संधी साधत कुणी कचरा टाकत रहातात. रोड चे अडगळीचे किनारे कचऱ्याने भरू लागते, पार्किंग बरोबर कचरा विल्हेवाटसाठी अडचणी तयार झाल्या आहेत. मी तर, एका बाईंनी कचरा भरलेल्या लहान लहान तिन पिशव्या नेतांना पहातो. एका जागेत एक, पुढच्या जागेत दुसरी आणि शेवटच्या ओसाड जागेत तिसरी अशा पिशव्या टाकतांना पाहिले. मला ही युक्ती कशासाठी ते कळलंच नाही.

रस्त्यावरची दुर्तफा लावलेली झाडे हल्ली

कधी फांदी डोक्यावर पडेल, नारळ कधी कुठे पडेल सांगता येत नाही. काही झाड वादळ सदृश्य वारा आला की फांद्यावर फांद्या आपटून तुटून पडतात त्यात पाऊस असला तर ओल्या पानांच्या भिजण्यामुळे जड फांद्या आणखीन वजन होऊन तुटतात, खाली कुणी असेल तर एक संकट तयार होते. रहदारी असलेले रस्ते जिथे भाजीवाले सकाळीच येतात. धंदा दुपारपर्यंत झाला की उरलेला पाला पाचोळा खराब भाजीच्या जुड्या तिथेच बाजू बघून टाकून देतात, महानगरपालिकेचे काम वाढवून ठेवतात. काही ठिकाणी आपोआप रस्ता बंद होतो की बंब किंवा ॲब्युलन्स जायची म्हटंली तरी तिला अटकाव होतो.

रस्ता उपयोगाचा आहे, महत्वाचा आहे, रहदारीसाठी रस्त्याची फार गरज आहे, वेगान जाणे येणे रस्त्याकडे लक्ष पुरविणे सर्वात महत्वाचा मनापासून शिस्त पाळण हे खरं तर फार गरजेच आहे. तेच तर समाजाकडून अपेक्षीत आहे. कारण हल्ली तर सर्वचजण गुरूस्थानी आहेत, काही रिश्ते मे दादा लगते है! आणि उरलेला हल्लीचा डॉयलॉग हिंदी सिनेमाच वाक्य रिश्तेमे हम सबके बाप लगते है!

❁❁❁


# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था




Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!

तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!



# वाहन अपघातातील रोग्याची तपासणी

**डॉ. सुभाष म्हैसकर**

सध्या वाहन अपघातांची संख्या भयावह झालेली आहे. सन २०१३ मध्ये वाहन अपघातात १ लाख ३७०० मृत्यू झाले. हा आकडा म्हणजे भारतात झालेल्या सर्व युध्दात शहीद झालेल्यांचे संख्येचे कित्येक पट आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर दररोज ३७७ माणसे बसलेले एक विमान कोसळत असते.

याला अनेक कारणे आहेत, पण आम्ही डॉक्टरांच्या दृष्टीने अपघातानंतर देण्यात येणारी वागणुक ही आहे. प्रथमतः पोलीसांच्या भीतीने लोक मदतीला येत नाहीत व येणाऱ्या लोकांना प्रथमोपचाराबद्दल संपूर्ण अज्ञान असते. प्रमुख विषयाकडे वळण्याआधी खालील गोष्टी नमुद कराव्याशा वाटतात त्या म्हणजे अपघातानंतर रोग्याला पाणी वैगरे पाजण्याची जणु शर्यतच लागते व रोगी बेशुध्द असेल तर हे पाणी श्वास मार्गात जाऊन रोग्याचा मृत्यू होऊ शकतो. त्यामुळे अपघातानंतर डॉ. ना विचारल्याशिवाय पाणी अथवा कॉफी देऊ नये.

दुसरी गोष्ट म्हणजे वेगाने जाणाऱ्या गाडीस एकाएकी ब्रेक लावल्यास मानेला फाशी दिल्याप्रमाणे झटका बसतो व त्यामुळे मानेतील मणका तुटतो व त्यामुळे श्वसनकेंद्राला इजा होऊन माणुस तात्काळ मृत होणे शक्य असते. हयाचे उदाहरण म्हणजे ३/४ वर्षापूर्वी श्री.मुंडे



यांचा अपघाती मृत्यू. अशावेळी मानेची कॉलर लावून मानेची हालचाल बंद करणे हे अतिशय महत्वाचे व सर्व प्रथम केले जाते व कॉलर नसल्यास काम चलाऊ कॉलर करण्याची पध्दत

आपल्या देशात ठाऊक नसल्याने बरेच अकारण मृत्यू होत असतात म्हणुन वरील दोन गोष्टी मुद्दाम सांगितल्या आहेत.

आता आपण आपल्या प्रमुख मुद्याकडे म्हणजे जरासे शिक्षण झालेल्या प्रथमोपचारकास कोणत्याही उपकरणाशिवाय कशी झटपट तपासणी करता येते त्याची पध्दत ही होय. ही पध्दत झटपट करणे फार महत्वाचे आहे. कारण कोणत्याही अपघातात जर श्वास अथवा हृद्यक्रिया केवळ ३ मिनिटांचे वर खंड पडल्यास मेंदुला प्राणवायू पुरवठा थांबतो व ६



व्या मिनिटाला माणसाचा मृत्यू झालेला असतो व श्वास अथवा हृद्य थांबल्यास ते तपासून त्यावर लौकरात लौकर C.P.R अथवा cardio pulmonary resuscitation सुरू करणे अत्यावश्यक ठरते. त्यासाठी खालील U.K व U.S.A मध्ये प्रचलित पध्दती देत आहे. त्याने केवळ ३० ते ४० सेंकदात महत्वाची तपासणि करून जरुर पडल्यास C.P.R चालू करता येते

त्या पध्दतीत खालील सुत्र लक्षात ठेवावे. D R A B C & Head to foot Examination आता ही तपासणी तपशील बघू या.

१)सर्व प्रथम D म्हणजे Danger अथवा धोका. हा धोका प्रथमोपचारकाला रोग्याला अथवा आजूबाजूच्या लोकांना आहे का ते प्रथम बघावे. कोणत्याही परिस्थितीला प्रथमोपचारकाने स्वतःचा जीव प्रशिक्षण असल्याशिवाय धोक्यात घालू नये. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे short circuit मध्ये चिकटलेला माणुस कोणत्याही परिस्थितीत वीजपुरवठा खंडीत केल्याशिवाय हात लावू नका. तुमचा जीव धोक्यात आहे. हा धोका प्रामुख्याने विषारी वायू ,वीज अथवा आगीने होतो. त्याचे भान ठेवावे.

२)R-Response- रोग्याची प्रतिक्रिया झटपट बघा त्यानंतर रोगी गुंगीत अथवा बेशुध्दीत आहे का ते बघा शुध्दी बघण्यासाठी प्रथम रोग्याला मोठ्याने नाव विचारा व काय झाले ते विचारा. ते सांगितल्यास त्याला डोळे उघडातला अथवा जीभ दाखवून आपले म्हणणे समजले का ते बघा तो नाव विचारल्यावर काहीच प्रतिक्रिया देत नसल्यास खांद्यावर थपडा मारून काय झाले पून्हा विचारा. हयात सूध्दा प्रतिक्रिया देत न दिल्यास तो रोगी बेशुध्द आहे व त्याला वेळ न

दवडता खालील गोष्टी कराव्यात.

३)मदत मागवा बेशुध्द रोगी म्हणजे गंभीर रोगी त्याला एकट्याने योग्य इलाज करण्यासाठी शक्यतो मदत मागावी म्हणजे डॉ. अथवा ॲम्ब्युलन्सला बोलावण्यास त्याला पाठवता येईल. लक्षात ठेवा बेशुध्दी मध्ये रोग्याला एकटा ठेवू नका.

४)A-Open Airway- ताबडतोब हवामार्ग उघडा. बेशुध्दीमुळे जीभ लुळी होते व श्वास मार्गात पडते व त्यामुळे श्वास मार्गाला अडथळा येऊन श्वास बंद होतो. बेशुध्दीमुळे जीभेच्या अडथळ्यामुळे श्वास बंद पडणे ही अत्यंत महत्वाची व सहज टाळता येणारी गोष्ट आहे त्यासाठी कपाळावर हात ठेवा व डोके अगदी मागे करा. हे करून हनुवटीला वर केल्याने श्वास मार्ग पुर्ण उघडतो. हे फारच महत्वाचे आहे.

B-Breathing त्यानंतर छाती व पोट खालीवर होते की नाही ते बघा हे केवळ १०-१२ अंक भराभर मोजेपर्यंत बघा. छाती व पोट न हलल्यास श्वास बंद असून त्याला ताबडतोब c.p.r अथवा cardio pulmonary resuscitation चालू करा.

C-Circulation- श्वास चालू असेल तरच नाडी बघा. नाडी चालू असल्यास हदयक्रिया चालू आहे. मात्र हातापायांची नाडी न बघता मानेतील नाडी Carotic नाडी बघा. ही सुध्दा बंद झाल्यावर C.P.R ताबडतोब न दिल्यास मृत्यू अटळ आहे. मात्र श्वास व नाडी दोन्ही क्रिया उत्तम चालू असल्यास पुढील Head to foot तपासणी करावी. त्यात प्रथम डोक्यामध्ये हात फिरवून रक्त किंवा टेंगूळ अथवा खड्डा असल्यास डॉ.ना ते दाखवा लक्षात ठेवा की डोके, छाती व पोट हे शर्ट बाजूला करून नीट बघावे. कारण ह्या जागांवर प्रथमत: किरकोळ वाटणाऱ्या जखमा जीवघेण्या ठरू शकतात हयाचे उत्तम उदाहरण म्हणजे अमिताभ बच्चनची पोटाची इजा. त्या नंतर रोग्याला हातपाय हलवायला सांगा व त्यावर काही जखम रक्तस्त्राव आहे का ते बघा.

ही तपासणी डॉक्टर येण्यापुर्वी करावी. जखमांमधला रक्तस्त्राव घट्ट दाबून थांबवाव. हाडमोड असल्यास तपास योग्य आधारफळी घ्यावी. पायांच्या हाडमोडीला आधारफळीला नसल्यास दोन्ही पाय एकमेकाला घट्ट बांधावेत म्हणजे हाडाची हालचाल थांबेल. वरील गोष्टींचा वापर केल्याने.

१.श्वास अथवा हृद्यक्रिया थांबल्यास लवकरात लवकर C.P.R सुरु करता येईल.

२.बेशुध्द रोग्याचा श्वासमार्ग उघडता येईल व अशा रीतीने अपघातातील अकाली मृत्यू टळतील.

**With best compliments from**

RAHUL

**RAHUL PHARMA**

*Benevolence, Perseverance & Excellence*

Mail id- rahulpharma2000@gmail.com
web - www.rahulpharma.com

**Address - A-03, Royal Industrial Estate, 5B,**
**Naigaon Cross Road, Wadala (w),Mumbai-400031**



# दुर्दशा

शोभना कारंथ

**जीवनका सच कडवा है**
**यहा कोई पल नही ठहरा है।**
**आज जीव की रफ्तार तेज हो गई**
**भगा दौडी में जिन्दगी कही खो गई है।।**

आज मनुष्य आपल्या भागदौडी मध्ये किती व्यस्त झाला आहे. त्यांच्या जीवनाची गती किती तेज झाली आहे कि तो आपल्या जीवाची किंमतच विसरून गेला आहे. शाळेची घाई, ऑफिसची घाई ट्रेन पकडण्याची घाई या मध्ये आपला अमुल्य जीव धोक्यात टाकत आहे. जणू जीवाचे मोलच राहिले नाही.

मनुष्याचा हलगर्जीपणा:- आपण रस्त्याचेच उदाहरण घेतले तर आजच्या दयनीय अवस्थेत असलेल्या रस्त्यावरून चालताना मनुष्य किती हलगर्जीपणाने स्वत:चे किती नुकसान करून घेतो. रस्त्यावरून चालताना आपण घाई घाईने नियमांचे पालन करत नाही. रस्त्याच्या डाव्या बाजूने चालायला हवे. रस्ता क्रॉस करताना सिग्नल पाहणे आवश्यक आहे. मोबाइलवर बोलता बोलता गाणी ऐकता ऐकता रस्ता क्रॉस करणं किती धोकादायक आहे. झेब्रा लाइन बघून क्रॉस करावे. फुटपाथ वरून चालावे अशा नियमांचे पालन केल्यास होणारे अपघात मृत्यू नक्कीच टाळले जातील. परंतू मनुष्य आता नियमांच पालन करत नाही म्हणुन अपघात, मृत्यूचे शिकार बनतात. महापालिका रस्ते बांधते ते




जनतेसाठी, नियम बनवले जातात ते सुरक्षतेसाठी परंतू फुटपाथचा उपयोग होतो व्यापारांचे खिसे भरण्यासाठी... व्यापारी फुटपाथवर आपला व्यवसाय करून कमाईकरत असतात आणि लोक वाहनांची ये-जा होणाऱ्या रस्त्यावरून चालतात. चालता चालता खड्डे पडलेल्या रस्त्यावर पाय लचकून वा पाय मुरगळुन खड्ड्यात पडतात. तर कधी वाहनाची धडक लागून हॉस्पिटलला भरती होतात.

स्वतःच्या आयुष्याबरोबर कुटूंबाचेही नुकसान होते. कर्ता माणुस नसल्याने परीवार उघड्यावर पडतो. कधी कधी तर रस्त्यावर फेकले जाणारे केळीचे साल एखाद्याला किती महागात पडते. २ रू.चे केळं हॉस्पीटलमध्ये त्याचे २ लाख मोजाचे लागतात. रस्त्यावर फेकला जाणारा कचरा, शिळे अन्न यामुळे रस्त्याची जागा किती व्यापून जाते. त्यामुळे रस्त्यावर होणारी कुचंबणा, अस्वच्छता, दुर्गंधी या गोष्टीला तोंड द्यावे लागते.

महापालिकेचा कारभार:- रस्ते बांधण्यासाठी कोटीने पैसे खर्च करूनही रस्त्याचे खड्डे बुजले जात नाहीत. एक पावसाची



जोरदार सर आली की रेती, खडी वाहून जाते. जागोजागी रस्त्याऐवजी खळगेच खळगे दिसून येतात. मग त्यामधून भरधाव जाणारी वाहनं त्यात लोकांची गर्दी.. .. मग काय... मृत्यूची संख्या, अपघाताची संख्या दिवसे दिवस वाढत चालली आहे. सकाळी बाहेर पडलेली व्यक्ति संध्याकाळी सुरक्षितपणे घरी परत येइल कि नाही याची खात्री देता येत नाही. या सर्व गोष्टींना जबाबदार कोण.. . ? यामध्ये पैसे खाणारे आलेच. निकृष्ट दर्जाचे रेती, सिमेंट वापरून आपले खिसे भरणारे कंत्राटदार कमी नाहीत. कधी नविन केबल टाकणे, पाणी कनेक्शन पाईप लाईन, गॅस पाईप लाईन, गटार पाईप लाईन, इलेक्ट्रीक कामे यासाठी वारंवार खोदकाम होतच राहते. खोदलेले खड्डे व्यवस्थितपणे बुजवले जात नाही, पुर्णरिती डांबरीकरण होत नाही. त्यामुळे खडकाळ रस्त्यावरून चालणे मुश्कील होऊन जाते. ज्येष्ठ नागरिक, लहानमुले यांना फार कष्टकरी होऊन जाते. रस्त्यावरील मॅनहोलची तुटकी फुटकी झाकणं तर कुठे झाकणच नसते त्यामुळे होणारे अपघात आणि पावसाळ्यात मॅनहोलमद्ये पडून होणारे मृत्यू ही मोठी गंभीर समस्या आहे.तर कधी फुटलेल्या फुटपाथ वरील टाईल्स अपघाताला आमंत्रण देत असतात.

एंकदरीत मनुष्याच्या जीवाची आज कोणाला कोणाची पर्वा राहिली नाही. आपला खिसा कसा भरेल...? या गोष्टीला महत्व दिले जाते. मग कोणाचा मृत्यू होवो किंवा अपघात होवो पर्वा नाही. ज्यावेळी जनतेकडून हंगामा होतो त्या वेळेपुरता महापालिकेकडून विचारविनिमय केला जातो. वातावरण थंड झाले कि येरे माझ्या मागल्या.. .. ज्यावेळी एका डॉक्टरचा मॅनहोल मध्ये पडून मृत्यू झाला तेव्हा रस्त्याची निगराणि केली गेली, परंतू थोड्याच महिन्यांनी एका महिलेचा मॅनहोलमध्ये पडून अपघात झाला म्हणजे या

गोष्टीला कोण जबाबदार.. ..? रस्ता म्हणजे ही फार मोठी समस्या झाली आहे. यामध्ये कमरेची हाडं तर मोडतातच परंतू वाहनाचे तसेच वाहन चालवणाऱ्याचेही आर्थिक शारिरीक नुकसाक होते. या फुटक्या रस्त्यामुळे काही गावात एस.टी वाल्यांनी संप केला, त्यामुळे गरिब जनतेला किती त्रास झाला. गाव असल्यामुळे जास्त दुसरी वाहनं नसतात. कोणी रुग्ण गंभीर स्थितीत असेल तर त्याला शहरात हॉस्पीटलमद्ये घेऊन जाणे अशक्य होते. त्यातच तो रुग्ण प्राण सोडून देतो. एखादी गरोदर स्त्री असेल तर अशावेळी काय होईल याची कल्पनाच करवत नाही म्हणजे या दुर्गतीला आलेल्या रस्त्यामुळे जनतेला किती त्रास सहन करावा लागतो ही विचार करण्यासारखी आणि तितकीच गंभीर गोष्ट आहे.

## सुरक्षित ड्रायव्हिंगचे दहा नियम

- प्रवास सुरु करण्याअगोदर-ड्रायव्हिंग लायसन्स आपल्या जवळ आहे याची खात्री करा.
- टायर मधील हवा, रेडीयेटर मधील पाण्याची तपासणी करा.
- स्टेपनी, फॅन बेल्ट, होस पाईप, टुल बॉक्स गाडीमध्ये ठेवा.
- सर्व लाईट व्यवस्थित काम करतात याची खात्री करा.
- नंबर प्लेट स्वच्छ आणि व्यवस्थित दिसते याची खात्री करा.
- सर्व खिडक्या साफ आहेत व त्यातून बाहेरचे स्पष्टपणे दिसते याची खात्री करा.
- मागील वाहने पाहण्यासाठी असलेला आरसा व्यवस्थितपणे आहे याची खात्री करा.
- सर्व दरवाजे व्यवस्थित बंद असल्याची खात्री करा.
- कोणतीही वस्तू अगर जनावर गाडीच्या खाली नसल्याची व पुढील मार्ग मोकळा असल्याची खात्री करा.
- गाडी सुरु झाल्यानंतर ब्रेक लावुन पहा



With Best compliments from

# SHRADDHA DISTRIBUTORS





# सुरक्षा अभियान

राजश्री खरे

बऱ्याच वर्षापूर्वी प्रभाकर पेंढारकर यांचे रारंग ढांग नावाचे एक पुस्तक वाचले होते. पुस्तकात बॉर्डररोड ऑर्गनायझेशन हिमालयात जेव्हा रस्ते बांधत होती तेव्हा सैन्यातील इंजिनियरांना अनेक संकटाशी सामना करावा लागला रस्ता बांधणीतील सर्वात अवघड भाग म्हणजे कड्यामधून रस्ते खोदून काढण्याचा त्याचे वर्णन करतांना तो इंजिनियर म्हणतो की एखाद्या वळणावर मृत्यू तुमची वाट पहात असेल तो पटकन गाडीत चढेल आणि शेजारी येऊन बसेल. थोडावेळ प्रवास चालू राहील आणि तो म्हणेल चलो तुम्हारा टाईम खत्म हो गया आणि मग तेथे राहतो तुमच्या नावाचा चबुतरा. सुरक्षा अभियानाचा विचार करतांना या वाक्याची प्रकर्षाने आठवण होते. एवढेच नव्हे तर गाडीतून प्रवास करतांना मनात विचार येतो खरंच मृत्यू शेजारी येऊन बसला नसेल ना?

आज परिस्थिती अशी आहे की घरातुन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक माणसाभोवती मृत्यू घुटमळतो आहे मग तो पायी प्रवास करत असो वा वाहनातून केव्हा कोण त्या व्यक्तिला उडवेल सांगता येणार नाही. त्यामुळे घरातून बाहेर पडलेली व्यक्ति सुरक्षित आली की देवाचे




आभार मानायचे ही वास्तव परिस्थिती आहे. रोज होणाऱ्या अपघातांच्या मालिकेचा विचार केला तर हरदासाची कथा मुळ पदावर या म्हणीप्रमाणे विचारांची गाडी थांबते भ्रष्टाचाराशी आपल्याकडे कित्येक गोष्टी मध्येच लाट आल्या सारख्या उगवत असतात. उदा. फेरीवाले उठविणे, रस्ता दुरुस्ती, गाड्या

व लायसन्स तपासणे पण हे सारे देखावे असतात आणि यात संबधिताचे खिसे भरले की परिस्थिती पुन्हा पुर्ववत त्यामुळे निर्णय शुन्य कायम स्वरुपी काहीच होत नाही. एवढेच नव्हे तर एकाच कामावर पुन्हा पुन्हा खर्च होत रहातो. भ्रष्टाचाराबद्दल बोलण्यासारखे आपल्या देशात तरी काही उरले नाही असे वाटते. एखाद्या अपप्रवृत्तीच्या मुळावर जोपर्यत घाव घातला जात नाही ती प्रवृत्ती मुळापासून उखडली जात नाही तो पर्यंत सुरक्षा अभियान काय किंवा दुसऱ्या कोणत्याही योजना काय फक्त कागदोपत्री देखावाच राहणार.

सध्या माणसं आणि गाड्या यांची संख्या बरोबरीने वाढते आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. लोकांच्या हातात आलेला अतिरिक्त पैसा, घरांची गरज भागविण्यासाठी लांब लांब घेतलेली घरे आणि म्हणुन जाण्यायेण्यासाठी घ्यावी लागणारी वाहने, माजलेली गुंडागिरी आणि प्रत्येक गोष्टीत घुसलेले राजकारण या साऱ्यामध्ये निरपराध्यांचा नाहक बळी जातोय. वाहनांच्या मानाने रस्ते फारच अरुंद असल्याने नियम तोडून वाहने चालविली जातात. प्रत्येक गोष्टीत पुढे जाण्याच्या घाईमुळे नाहक बळी जात



आहेत आता रस्त्यांच्या खड्ड्यांचा विचार केला तर वर्षानुवर्षे ठराविक ठिकाणी पडणारे भलेमोठे खड्डे, लोकांची ओरड झाल्यावर त्याची केलेली तात्पुरती दुरुस्ती यात काही बदल होतच नाहीये नविन तंत्रज्ञान विकसित होऊनही अशी परिस्थिती का? याचा विचार झाला पाहिजे.

दुसरे अपघाताचे मुख्य कारण पहाटे २ ते ५ या वेळात बरेच अपघात होतात. ती वेळच अशी आहे की एक क्षण का होईना कोणालाही पटकन डुलकी येणारच. पण तोच एक क्षण का अनेकांचे प्राण घेतो. त्यामुळे या वेळात कटाक्षाने ड्रायव्हींग बंदच ठेवले पाहिजे कारण आपण पाहिले तर या वेळात अनेक अपघात होऊन आपले कितीतरी अभिनेते वा महत्वाच्या व्यक्तिंनी प्राण गमावले आहेत. आमच्याच घरात घडलेली गोष्ट भावाचे कुटूंब रात्री टुरिस्ट कारने कोल्हापुरला जायला निघाले. पहाटे २ वाजता गाडी साताऱ्याजवळ

झाडावर आदळुन अपघात झाला. त्यात वहिनीचे जागीच निधन. मुलगा व सून कित्येक महिने हॉस्पीटलमध्ये. दुसरा एक अपघात समोरून येणाऱ्या ट्रकपासून बचाव करतांना गाडी खड्डयात गेली आणि गाडीत बसलेल्या व्यक्तीला कायमचे अपंगत्व अशा घटना मोजता येणार नाहीत एवढया आहेत.

लहान रस्त्यावर तर दोन्ही बाजुंनी वाहने उभी, फुटपाथ व्यापाऱ्यांनी बळकावलेले अशा परिस्थितीत पादचारी, वृध्द जीव मुठीत घेऊन चालत असतात. सुरक्षा अभियान ठराविक काळापुरते राबविण्याऐवजी सुरक्षेसाठी काही ठोस नियम करून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे अन्यथा कुंपणच शेत खाते त्याला कोण काय करणार? पुढील गोष्टींसाठी कडक नियम झाले पाहिजेत.

१) वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माणसे भरणे.

२) मोबाईलवर बोलणे .

३) वेळेची मर्यादा न सांभाळणे.

४) दारू पिऊन गाडी सांभाळणे.

५) ओव्हरटेक करणे.

६) गाडीची दुरुस्ती वेळेवर न करणे.

७) खड्डयात बाबत योग्य ती काळजी घेणे इत्यादी.

✽✽✽



SAFETY FOR ALL
ALL FOR SAFETY

सुरक्षाविषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

# सुरक्षा अभियान

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षेविषयक कार्य करण्याच्या रस्ता सुरक्षा व अन्य सुरक्षाविषयी बाबत जाणून घ्यायचे असेल व या क्षेत्रात कार्य करायचे असेल तर संपर्क साधावा :**

संस्थापक / अध्यक्ष
**डॉ. विलास ज. पवार**

ऑफिस : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) -४०० ६०२
०२२-२५३६४१४१ / ९८२११६१६६२



# सुरक्षा

धनश्री क्षिरसागर




सुरक्षा हा शब्द वाचायला व त्याहीपेक्षा स्वानुभवाला आल्यावरच त्या शब्दाचे महत्व कळते, सुरक्षा अभियान ही स्वयंसेवी संस्था आहे. नागरीसुरक्षा सेवाभावी संस्था अनेक आहेत. अश्या संस्थामार्फत बरेचसे उपक्रम चालविलते जातात व यशस्वी होतात. समाजाला मोठा दिलासा मिळतो. हे उपक्रम उल्लेखनीय आहेत. अशा संस्था चालविणाऱ्या बरेच समाजोउध्दाटक व्यक्ति आणि सेवाभावी संस्था आहेत.

पुर्वी स्वत:ची सुरक्षा नव्हे रक्षणाची जबाबदारी आई-वडील, मोठा भाऊ, मोठी बहिण, विवाहानंतर पती, पुढे मुलगा अशा कौटुंबिक सामाजिक सुरक्षेची आधारवड होती. स्त्रीयांना पावलोपावली रक्षण व्हावे याची एवढीशीसुध्दा काळजी नव्हती, कौटुंबीक व सदस्यांची सुरक्षा प्रमुख व्यक्ती पाहत असे. कुटुंबात व समाजात सुरक्षेची एवढी आवश्यकता जाणवली नाही.

पण जसा काळ लोटला समाजाची सर्वांगीण वाढ झाली, चौफेर विकास झाला. समाज सर्व परीने वाढीस लागला शिक्षणाचे स्थान समाजाला जाणवले व त्याचे महत्व वाढीस लागला. शिक्षणाचे स्थान समाजाला

जाणवले व त्याचे महत्व वाढीस लागले. स्त्रियांना शिक्षण घेणे काळाची गरज ठरली. समाजात शिक्षणाबरोबर चांगुलपणा, सुशिक्षित बरोबर विकृती वाढीस लागली. ह्या विकृतीची कारणे बरीच आहेत, जसे मानसिक कौटुंबिक सामाजिक आर्थिक असली तरी त्या समस्येने आक्राळ विक्राळ रुप धारण केले आणि त्याचे वाईट पडसाद व्यक्ति,कुंटूब समाजावर व्हायला लागले असे गैरप्रकार घडायला दिवसरात्र वेळ अपुरा पडायला




लागला अशा या त्रिशंकू अडचणीत व्यक्ति समाज राष्ट्राला सुरक्षेचे भान आले. त्यासाठी स्वतःची सुरक्षा स्वतःला करायला शिकले पाहिजे हा प्रथम मूलमंत्र कानोकानी एकमेकांना सांगायला हवा.

त्यासाठी सर्वतोपरी कोणत्याही सुरक्षा अभियान स्वयंसेवी संस्था किंवा सरकारी संस्थावर अवलंबून राहू नये. दिवसेन् दिवस समाजसंख्येतील वाढ, लोकांची गर्दी घर गल्ली गल्ली, रस्त्यावरून, गावागावातून चांगलीच जाणवत आहे. मोठमोठ्या शहरात मुंगीलाही पाय ठेवायला जागा नसते तेव्हा रस्त्यावरील गुन्हे, अपघात यांचे प्रमाण वाढतच राहणार त्यासाठी सरसकट स्वयंसेवी संस्था अहोरात्र कार्यरत आहे पण वाढत्या गुन्हयांचे व अपघाताचे प्रमाण कमी झाले तरी ते दिवसून दिवस ते आहेच. स्वतःच स्वतःची सुरक्षा करून ह्या सर्व संस्थाना कळत नकळत आपण मदतीचा हात पुढे करू ह्या सर्वतोपरीने कार्यरत आहेत हे आपण सर्वांना माहित आहे त्यांचे हे उपक्रम महाराष्ट्राला गौरवास्पद आहे. त्याच्यावर सर्व भार देऊन आपण सर्व सामाजिक धार्मिक नैतिक मुल्ये सरकारी कायद्यांचे उल्लंधन करायचे व सरकार समाज कुंटूबावर ताशेरे मारून मोकळे व्हायचे. हे जबाबदारी सुशिक्षित २१ व्या शतकातील माणसाचे लक्षण नव्हे. तंत्रयुगातील खालून वर पर्यंत वर्ग याला अपवाद नाही. दिवसरात्र, वेळी अवेळी रस्त्यावर होणारे अपघात ही गंभीर बाब आहे. वाहतूक नियमांचे पालन काटेकोर करायला हवे. रस्त्यावर अनेक सुचनांचे

माहिती फलक फक्त टांगलेले असतात बिच्चारे! त्यांच्याकडे लक्ष द्यायला हवे.

वेळेच्या मर्यादांचे पालन काळवेळेचे बंधन पाळून स्वतःभोवती मर्यादापालनाची सीमारेषा आखुनच आपण समाजात वावरायला हवे. मुक्तपणे, मुक्तसंचार करणे ही काही आधुनिक मानवाच्या उत्कर्षाच्या निकष नक्कीच नाही.

निश्चितच आपण गांभीर्याने विचार करावा. आपणहून संकट, अतिप्रसंगाला आंमत्रण होऊ नये नंतर मदत मिळाली नाही उशीरा मिळाली असा आरडाओरड करून दुसऱ्याला जबाबदार ठरवू नये. आपल्या शिक्षणाचा सुशिक्षितपणाचा अभिमान बाळगू अशा तऱ्हेने आपआपल्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडून स्वतःला धन्य मानावे असे वाटते. ह्या सेवाभावी संस्थाना प्रत्येक भारतीय नागरिकाने असा मदतीचा सेवाभावी हात पुढे करावा असे आवार्जून सांगावेसे वाटते.

❃❃❃

## घोषवाक्य

सर्वांनी घेऊ या एकच ध्यास,
कार्यारंभी ठेवु सुरक्षिततेची कास


# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था




Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!

तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!

# WITH BEST COMPLIMENTS FROM

# Cyber Safe Society

## Mission & Vision
## To create a cyber safe world

**<u>ACTIVITIES UNDERTAKEN</u>**

-WORKSHOPS ON THE PREVENTION OF CYBER CRIME
- SEMINARS ON CYBER SAFETY
-GUIDANCE & SUPPORT TO VICTIMS
- PUBLICATIONS ON CYBER SECURITY
-TRAINING PROGRAMS FOR SAFE CYBER LIFE
- DISASTER MANAGEMENT- AWARENESS CAMPAIGNS
-COLLABORATION WITH LAW ENFORCEMENT

**Join our movement and make india a cyber safe country**
**www.cybersafesociety.org | +919167785599**



# सुरक्षा

एम. बी. कोल्हे



प्रत्येकाने स्वतःची तसेच दुसऱ्यांची पण रक्षा करायची असते म्हणजेच सर्वांची सुरक्षा होईल म्हणुन सुरक्षा रक्षक नेमतो व सुरक्षा अभियान साजरा करतो. वाहतूक पोलीसांची नेमणुक करतो. काही मोठ्या चौकात सिग्नल बसवले तरी वाहतूक पोलिस सुरक्षेसाठी ठेवतो. वाहतूक सुरळीत व सुरक्षितेने व्हावी, घातपात अपघात दुर्घटना होऊ नये. शेवटी मानवाने आपल्यासाठी मॅन पॉवर वापरली म्हणुनच वाहतूक वर्दळ व रहदारी वर्दळ वाढतच चालली. अति सर्वत्र वर्जयेत म्हणुनच रहदारीचे, वाहतुकीचे नियम बनवून ड्राइविंग लायसन्स दिले जाते व वाहतूक सप्ताह पाळले जातात.

अशी ऑक्सिडेली भेट होण्यापेक्षा योगायोगाने किंवा संयोगाने व्हावी. संहिता आचारसंहिता ही सर्व ठिकाणी असते पण पाळतो कोण? आपल्याला आपली रक्षा करून ती सुरक्षा व्हावी असे प्रत्येकाला हार्दिक व बौध्दिक वाटले पाहिजे. हदयातील कंपन हे निःस्वार्थी असते बुध्दितून (मेंदुतून-मनातून) जे कंपन येते ते स्वार्थी. अहेकार ईगो हे स्वार्थी कंपनच छोट्या-मोठ्या व किरकोळ अपघातांना व दुर्घटनाना आमंत्रण देतात. रहदारीचे व वाहतूक नियम पाळत नाही शिवाय नियम बाह्य वागतात. वाहतूक हवालदार (traffic police) यांच्या बरोबर वाद घालतात, दम देतात, मारतात सुध्दा, चिडून- रागाऊन

मोठ्याने ओरडतात, गोंधळ घालतात म्हणतात. मी हा आहे. पाहून घेईन, बदली करीन समजतोस काय स्वतःला. मी नगरसेवक/ आमदार/ खासदार आहे. माझा.. .. .. हा .. हा ... .. नातेवाईक आहे. ओळखीचा आहे. तुला जे काय करायचे आहे ते करून घे इत्यादी.

दंड भरायची, मारायची तयारी, हत्यार, पिस्तूल दाखवून वेळप्रसंगी वापर करण्याची तयारी असते. पदाचा दुरूपयोग व स्वांतत्र्य म्हणजे स्वैराचार-संचार स्वातंत्र्याचा भंग.

दक्षिण भारतात वाहतूक हवालदाराने नियमाप्रमाणेच मोठ्या सरकारी हुद्यावरच्याची गाडी व मिरवणुक थांबवून अम्बुलन्स ला वाट (मार्ग) मोकळा करून दिला होता. धन्य तो ट्राफिक हवालदार व कायद्याचे पालन करणाऱ्याला साथ देणारा. जगी भावनेहुनी या कर्तव्य थोर जाणा.

प्रवाश्यांचा प्रवास अधिक सूखकर व्हावा हया साठी प्रमुख ३ घटक आहेत. रस्ता, वाहन व पार्किंग, भोंगा व हयांना हाताळणारे ड्रायव्हर, वाहतुक विभाग व प्रवासी-पेसेंजर शुभ-यात्रा ह्या सर्वावर अवलंबून आहे.

१)रस्ता-रस्त्यासाठी मंजूर झालेला सर्व निधी रस्त्यासाठीच विशिष्ट कालावधीत खर्च करावा, खड्डे पडणार नाही व पडले तर दुरूस्ती लवकर करावी म्हणजे गेला खड्ड्यात हे कोणी म्हणणार नाही. खड्डे कमीत कमी, सुरक्षित प्रवासाची हमी.

२)वाहन व पार्किंग- वाहन रस्त्यावर



आणण्याची आधी ते नीट चालणार की नाही. वाटेवर वाट लागणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या व दुसऱ्यांदा सोईसाठी गाडी पार्किंग नीट करावी. गाडी काढणे सुलभ व सुखकर आपल्या व दुसऱ्यासाठी,इंधन व वेळेची बचत.

वाहन तळावर सुध्दा गाडया नीट लावाव्या आपल्या व दुसऱ्याच्या वाहनाची खराबी होणार नाही. वाहन कोंडी होणार नाही. वाहतूकीचे नियम पाळले तर वाहन, वाहक व वाहनतळ यांना अत्यानंद .

रस्त्यावरून वाहने चालवतांना पायी चालणारे, वृद्ध, बालक, गर्भवतीस्त्रिया, अपंग

इ.चा विचार करावा तसेच, प्रभात फेरी, मिरवणुका, मोर्चे, मॅरोथॉन स्पर्धा, चौक, वळण सावध रहावे व दुसऱ्यांना सावध करावे जगा व जगवा.

मोर्चा अशा वेळी बंदोबस्त चांगला करतात. सहकार्याने वाटचाल.

भोंगा-प्रत्येक वाहनाला भोंगा असतोच, खरं म्हणजे भोंगा अपघात होऊ नये,सावधगिरीचा इशारा असतो. काही गाड्यांचे भोंगे ठरलेले असतात.उदा रुग्णवाहिका, अग्निशमन दल, वायरलेस तसेच सायकल,मोटार सायकल,बाईक रिक्षा, स्कुलबस,माल वाहतूक गाड्या, टँकर यांना पण विशिष्ट पध्दतीचे भोंगे पाहिजेत. संचार स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार स्वातंत्र्य नाही. R.T.O ने पण वाहनपडताळणी व परवाना देतानां बंधनच ठेवावी. ध्वनी प्रदुषण ही होणार नाही. वाहनचालक विशिष्ट भोंग्याने सावध होतील.

सहकार द्या व सहकार घ्या, पोलिस, वाहतूक पोलिस, स्थानिक स्वराज्य संस्थाचे पदाधिकारी, नागरिक सुरक्षा दल शाळा कॉलेजातील A.c.c, N.c.c.,R.S.P., scout guide वैद्यकीय सेवा सर्वांनी सहकाऱ्यांच्या भावना ठेवल्या तर रक्षा होऊन सुरक्षा होऊ शकते सुरक्षा अभियान योजना (पर्व)सफल व सुफळ देऊ शकते.

❁❁❁



# ओम पब्लिकेशन

- इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे, जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)
  लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार
- कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक
- सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक
- सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक
  संपादक - विशाखा पवार
- श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह
- ड्रिंक्स ॲन्ड डाईन -मिनी कॉफी टेबल बुक (मराठी आणि इंग्रजी)

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन

संर्पक

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- २५३६४१४१

E-mail : vilaspawar@ompublication.com



# रास्ता दुर्घटना कैसे टाला जा सकता है

ऊषा गौनियाल




रास्ता दुर्घटना कैसे टाला जा सकता है। यह वाक्य अपने आप में बहुत बड़ा प्रश्न चिन्ह है किस तरह हमेशा ध्यान में रखना चाहिये जैसे की हम अक्सर जब रास्ता क्रॉस करते है तो अक्सर हमारी निगाहे चौकनी रहती है। और निगाहें चौकनी रहेनी भी चाहिये क्योंकी जरा नजर चूक जायेगीं तो कोई दुर्घटना होने के चांसेस होती है। जब हम रास्ता क्रॉस करते है। तो सबसे पहले सिग्नल  हो तो ही रास्ता क्रॉस करे वरना आप जहाँ खड़े है वही खडे रहिये। और सिग्नल होने का इंतजार करें नही तो गाडीयाँ कितनी तेजी से आती है और जाती है। तो ऐसे समय में आपको और हमको हमेशा चौक्कना रहेने की जरुरत है। कभी चलती ट्रॅफिक याने गाडियाँ चल रही है और ऐसे में हमें जल्दी में ऐसे समय में हम जल्दी में है तो और हम आव देखते है ना ताव देखते है गाडीयों के बीच से रास्ता क्रॉस करने की कोशीश करते है। ऐसी गलती न करें। और ध्यान से रास्ता क्रॉस करें। जल्दबाजी में कोई भी दुर्घटना घट सकती है हम या आप में से कोई भी घाई या जल्दी में भागकर रास्ता क्रॉस करने की कोशीश करते है तो हम दुर्घटना का शिकार हो जाते है। सबसे पहले हमे अपने दाये बाये

तरफ ध्यान से देखना है और कभी कभी गाडीयों की रफ्तार भी इतनी तेज होती है, दुसरा कारण है की कभी कभी गाडीयों का ब्रेक फेल होने से भी एक गाडी दुसरी गाडी को डॅश करती है। इसतरह से भी रास्ते में दुर्घटना घट जाती है। कभी कभी तो हम सही तरीके से भी खडे रहते है रास्ता क्रॉस करने के लिये तो ऐसे में भी दुर्घटना घट जाती है। कभी कभी तो हम जहा खडे है। जिस रोड पर वो रोड पर गाडी चढजाती है और उसपर वो क्या करे जो अपनी जगह सही है पुरी तरह गाडी का दोष है या गाडी



चलाने वाले का दोष है। जो भी हो ऐसी बेतुकी दुर्घटना होती है। दुसरी तरफ हमारे भारत देश में मुंबई महाराष्ट्र में आये दिन दुर्घटनाये होती रहती है। क्योंकी यहा की सडके या रास्ते सही नही है। आये दिन एक ना एक आदमी सड़क या रास्ते के दुर्घटना का शिकार होता है। रास्ते पर कही पर काम चल रहा है। तो कही पर पुल बनाने का काम चल रहा है। तो भी ट्रफीक बढजाती है। और आये दिन इन सड़को की वजह से दो - पैये या तीन - पैये वाला वाहन में बैठनेवाले या चलानेवाले चालक भी इन हादसों का शिकार होते है। फिर कभी कभी बस तो कभी ट्रक भी कारण होते है। दुर्घटना इनसे भी होती है। वैसे तो ट्रक ड्रायव्हर भी इतनी तेज रफ्तार से और पिकर गाडी चलाते है। क्योंकी ये लोग एक शहर से दुसरे शहर मालगाडी में

लेकर जाते है। और इन्हें पिकर चलाने की आदत पड़ जाती है। और यह ड्रायव्हर जल्दी जल्दी गाडी की रफ्तार तेज करके माल को शहर को पहुँचाने की जल्दी में यह लोक खुद भी दुर्घटना का स्विकार होते है। और यहाँ तो

इनकी गाडीयाँ ट्रक के नीचे कोई आ जाता है। और वह इनके ट्रक के नीचे आ जाने से या तो अपाईज हो जाते है या अपनी जान गवा देते है। वैसे तो आजकल ट्रफीक पोलीस की सुरक्षा के वजह से कई कई पर हादसे या दुर्घटना होने से बच जाते है। पोलीस जो ट्रॅफिक में आये दिन दुर्घटनायें होती है जैसे की शराब पीकर गाडीयाँ कभी रोड के आसपास ढाबे, चाय के स्टॉल, फल, फ्रुट बेचनेवाली गाडीयाँ सामान बेचने वालों की वजह से सडकों के दोनो और से दुकाने वैगरा होने से भी भीड़भाड़ की वजह से भी दुर्घटनाये घटती रहती है।

हम सभ्य भारतीय नागरिक होने के नाते हमे हमेशा ध्यान रखना चाहिये कोई



या बाईक टॅक्सी या ट्रक चलाना या बाईक सवार शराब के नशें में वाहन चलाकर ये लोग ट्रॅफिक का नियम तो तोडते है। और कई बार तो आजकल के युवा नौजवान तेज गती से मोटर सायकल की तेज रफ्तार को ही अपना जीवन और फॅशन समजते है। इन लोगों को न तो अपनी जीवन की पडी है और न तो रोड पर चलने वालों की पर्वा है और तो और अपने पॅरेंटस की भी पर्वा नही है। वैसे देखा जाये तो हादसा या रास्ते में दुर्घटना होती है तो क्यों होती है हमारा कर्तव्य है हम सब नागरिकोंका कर्तव्य है की, हम सब मिलकर एकजुट होकर कार्य को अंजाम दे जैसे की, रोडवेज वालों से बातचीत करके आगे के प्रणाली के बारें में जानकारी ले हमें आगे किस तरह से कार्य को अंजाम देना है। जिससे रास्तों में आये दिन रास्तो में दुर्घटना होने से हमारी आम जनता जो खास है उनकी सुरक्षा का खास ध्यान रखने

की जिम्मेवारी किसीको तो लेनी ही पडेगी। हमारे देश में समाज की सेवा करने वाले समाज सेवक, सेविकायें इतने बड़े देश के राजनेता है जो इतनी बड़े देश में भारत में हमारी आम लोग जा खास है। उनकी जिवन का सुरक्षा का ध्यान रखें और भविष्य में कोई परिवार में से किसी का बेटा तो किसी कि बेटा या बेटी माँ पिता, भाई-बहन और कोई अन्य व्यक्तिभी किसी भी तरह से सड़क या रास्ते में चलते चलते किसी गाडी या बस ट्रक के नीचे आकार हादसे का या दुर्घटना का शिकार ना होओ। और हम सब को मिलकर इसपर कोई कारवाई करनी चाहिये। हर चौराहे पर ट्रॅफिक पोलीस का बंदोबस्त होने से वेह लोग कितनी मुस्तदी से अपना कार्य करते है। कही घंटे लगातार फिर भी दुघटनायें घटी है। क्योंकी इतनी भिडभाड है जहॉ देखो वहा गाडीयों की भिड है। एक तो सजनसंख्या बढजाने से भी गाडीयों की तादत बढगँई है। आर लोगो में पेंशन्सी कम हो गई है। जीसे देखो वह भाग रहा है, सभी को जल्दी है, घर जाने की , ऑफीस जाने की हर इन्सान भागे जा रहा है। कोई एक व्यक्ती को एक गाडी चाहिये पुरी की पुरी ऐसा किजीये आपके आस पास जो भी कोई व्यक्ति आप जहाँ ऑफिस में काम करते है। तो आपके साथ दोन चार व्यक्तिओं को अपने साथ कार में बैठाना चाहिये। जिसे आपका समय भी कट जाये और आपको आने जाने का भाडा भी मिल जायेगा। और चार व्यक्ती कोस एक एक गाड़ी लेकर जाने से अच्छा है की एक व्यक्ती की गाडी में चार पाच व्यक्ती अच्छी तरह से आ सकते है। और रास्ते में ट्रॅफिक जाम भी नही रहेगा गाडीयों की तादाद भी कम हो जायेगी चाहे गाडी हो या टॅक्सी हो सबको अपनी सूझ बूझ से काम लेना चाहिये और तो और आपका पेट्रोल डिजेल भी बच जायेगा और रास्ते में भी ट्रफीक जाम नही मिलेगा। और भिड न होने के वजह से कोई दुर्घटना भी नही घटेगी और कोई भी व्यक्ती की मनस्थिती डर, घबराहट, बैचेनी या कोई अन्नकारण से भी जो दुर्घटना घटने कार कारण है तो वह कोई भी हो सकता है जैसे कारड्रायव्हर हो, या ट्रक चालक हो, या बस ड्रायव्हर हो या टॅक्सी ड्रायव्हर हो या स्कुटर चालक हो या मोटर सायकिल हो या कोई अन्यवाहक चालक होसब की मनस्थिती और घटना, दुर्घटना यह सबकि मानसिकता पर निर्भर करता है। की उनकी मनस्थिती कैसी है जब वे रास्ते या रोड या सड़क पर वाहन चलाते है। तो उन्हे कीस तरह से अपनी वाहन का उपयोग करना चाहिये। और कितनी रफ्तार से गाडी को चलाना चाहिये। जिससे भविष्य में आने वाले दिनों में कोई भी वाहन दुर्घटना का

शिकार ना हो। भविष्य के लिये हरेक वाहन चालको को अपनी वाहन की गती का ध्यान रखना चाहिये, जिससे की वाहनचालक, जिस वाहन का उपयोह करता है। उसे उस वाहन के बारे में पुरी परी जानकारी होनी चाहिये। जै से की वाहन की रफ्तार वाहन का ब्रेक वाहन का मेंटेनेन्स करके रखना चाहिये। उसकी देखरेख वजह से भी पर्यावरण में भी काफी फरक पडेगा जब पर्यावरण स्वच्छ और साफ होगा तो हमें स्वच्छ ऑक्सिजन मिलेगा। ना कि उन लोगों से शिकायत है जो अपनी गाडी को मेंटनेन्स करके नही रखते है। और गाडीयाँ आये दिन धुँआ छोडती है। जिससे पुरा वातावरण दुआ और दुर्घटना से भर जाता है। जैसे आप अपने को स्वच्छ रखते है। उसी प्रकार अपने वाहन को भी ऑईल, पाणी, पेट्रोल आदि की जरुरत पड़ती है। उसी प्रकार हमें हमारी वाहन से प्लस पाँइंट मिलेगा जिसका परिणाम आप हम सब देख सकते है । की किस तरज से पर्यावरण स्वच्छ होगा तो हमारी आपकी सोच, और हमारी मन की स्थिती काफी अच्छी होगी। हम अच्छा सोचेंगे उसका परिणाम ही अच्छाही होगा। घटना और दर्घटना तब घटती है जब हम हमारे आस पास का परिसर और पर्यावरण स्वच्छ और साफ होगा तो ही परिणाम अच्छे होंगे और जब हमारी बुद्धी और शरीर हमारा साथ देंगे तभी जाकर हम कोई भी कार्य को नियंत्रण या नियंत्रित करते है या कर सकते है। ऐसे कई कारण है जो हमारे जीवन से जुड़े है। और जो हमारी जीवन काल में अच्छे और बुरे परिणाम के रुप में आते है। थोडी सी शांती और थोडासा ध्यैर्य, और हुशारी और बुद्धिमानीका मन मस्तीष्क स्थिती पर पुरा दारोमदार है। मन अगर बिमार है तो बुद्धी और शरीर आपका ऐसे में क्या साथ देगी । ऐसे समय में अपने आप को थंडे दिमाग से और संयम से कार्य करना चाहिये । क्योंकी ट्रॅफीक भीड़भाड और लाखों की संख्या ओं मे गाडीयों का चलना और प्रदूषण ध्वनी गाडीयों की आवाज सायरन और ये सब भी कारण है। घटना और राते मे हो रही दुर्घटना का कारण हो सकती है । हमें अपनी तरफ से सतर्कता और घटना दुर्घटना न हो। भविष्य के लिए सुरक्षा और ट्रफिक पोलीस के साथ योगदान किजीए ।

❃❃❃

**घोषवाक्य**

**सुरक्षिततेचा अभाव,**
**करी सुरक्षित जीवनाला अटकाव**



# सुरक्षा अभियान - घोषवाक्य

१) डावी कडून पुढे जाल, असुरक्षेचे बळी व्हाल
२) नाही पाळला नियम, अपघाती जिवन कायम
३) वाहतुकी नियमांचे उल्लंघन, म्हणजे अपघातास आमंत्रण
४) काहुर विचारांचे ठेवाल, तर अपघाती पस्तवाल
५) निष्काळजीपणे चालवतो वाहन, म्हणून वाढते अपघाताचे प्रमाण
६) नाही पाळला नियम, अपघाती जीवन कायम
७) गप्पा रहदारीच्या रस्त्यावर, तर बेतेल तुमच्या आयुष्यावर
८) खात्री शिवाय पुढे जाऊ नका, घाईचे बळी होऊ नका
९) करा हेल्मेटचा वापर, असुरक्षितता जाईल दूरवर
१०) नका घेऊ दुसऱ्याची गती, नाही तर व्हाल अपघाताचा सोबती
११) नका करू नजर विचलीत, मिळेल अपघाती फलीत.
१२) निवड करा एकाची, दारू पिण्याची अथवा ड्रायव्हिंगची!
१३) वेग कमी जीवनाची हमी.
१४) आवरा वेगाला सावरा जीवाला
१५) अति घाई संकटात नेई.
१६) नजर हटी दुर्घटना घटी
१७) नाही पहाल तर खड्ड्यात जाल.
१८) प्रवासी आहात स्पर्धक नाही.
१९) शक्य त्याला जाऊ दे आधी, सुरक्षिततेसाठी गोष्ट ही साधी.
२०) चुक छोटीशी खेळू आयुष्याशी.
२१) रांगेची शिस्त, प्रवास अस्त
२२) नको प्राणहानी, नको वित्तहानी नको गंभीर जखमा, नको अपंगत्व वाहतुकीचे नियम पाळूया रस्ते अपघात टाळू या ...



# अपघात एक यक्ष प्रश्न

**चारुलता कुळकर्णी**

पुर्वी डोंगरी रस्ते, पायवाट, उंट, घोडा यावरून वाहतूक होत असे पुढे बैलगाडी, मोटार आली. तेव्हा सुरक्षा विषय फारसा महत्वाचा वाटत नसे. तसेच लोकही विशेष प्रवास करीत नसत. त्यामुळे एखादा दुसरा अपघात होत असे.

ह्या आधुनिक भौतिक काळात लोकसंख्या वाढली. दळण वळण वाढले. लहान रस्त्यापासून महामार्गापर्यंत वाहनांची ये-जा वाढली. त्यामुळेच हल्ली वर्तमान पत्रात रोजच अपघाताची बातमी वाचतो. बस नदीत कोसळली ट्रकच्या धडकेने रिक्शा उलटी झाली. रस्त्याच्या कडेला पाण्याचा टॅंकर पडला. परिणामी निष्पाप लोक मारले गेले. गॅस सिलेंडरचा ट्रक उलटा झाला. लोक गंभीर जखमी झाले. वरातीचे लोक घेऊन निघालेला ट्रक सॅन्ट्रोकार वर आदळला नवरदेवासकट २५ लोक जागीच ठार, पंधरा लोक जखमी झाले, चार तास वाहतूक ठप्प.

संप-मोर्चा यामुळे वाहतूकठप्प होते. वाहनांची तोड-फोड होते, चवताळलेले संपकरी दगड मारतात पोलिस-लोक जखमी होतात. आपल्या जवळचे, ओळखीचे लोक नातेवाईक असतील तर जीव अधिकच हळहळतो. दुःखी होतो. म्हणूनच आता हा प्रश्न ऐरणीवर आला. २०११ साली सुरक्षा अभियानाच्या अहवालानुसार जवळ जवळ १३ हजार लोकांचा ह्या राज्यात मृत्यू झाला. २४ हजार गंभीर जखमी , कित्येक कोटीची वित्तहानी झाली. जनता व सरकार खडबडून तेव्हा जागे झाले. काही अपघात मानवी चूकांमुळे तर काही नैसर्गिक आपत्ति व अन्य कारणांमुळे अपघात होतात. रस्त्यांत लोक केळीचे साल कचरा टाकतात, त्यावर पाय घसरून अपघात होतात. गुरे-ढोरं खाण्या साठी रस्त्यांत येतात त्यांना टाळण्यासाठा काही वेळा अपघात



होतात.

ट्रक मधून किंवा गाडीवरून लोखंडी पट्ट्या किंवा सळ्या देणे धोक्यांचे आहे. एकदा टेम्पोला मागून सळ्या नेणाऱ्या ट्रकने धडक दिली. टेम्पोतील माणसाच्या शरिरातून आरपार सळ्या गेल्या.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला गाड्या लावणे मग माणसांनी चालायचे कसे? फुटपाथवर विक्रेते व भाजीवाले ! फुटपाथचा उपयोग झोपण्यासाठी केला जातो. मद्य धुंदीत किंवा गप्पा मारतांना ड्रायव्हरचा ताबा सुटतो व



लोक मरतात. पदपथ चालण्यासाठी कधीच मोकळे नसते.

रस्त्यावरील भरधाव धावणाऱ्या स्कुटरमुळे पादचाऱ्यांचा अपघात होतो. रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांचा अपघात होतो. रस्ता ओलांडताना सुध्दा भरधाव येणारी स्कुटर- गाड्यांमुळे अपघात होतो.

रस्त्यावरील कचरा-कुंड्या भरून वाहतात. मग गुरे-ढोरे-कुत्रे, डूकरे, कचरा गोळा करणारी माणंस, नाक मुठीत घेऊन चालणारे पादचारी ह्यामुळे अर्धा रस्ता त्यांतच जातो. उरलेल्या रस्त्यांतून वाहन टाळतांना जनतेला व लोकांना टाळतांना वाहनांना कसरत करावी लागते. अशा परिस्थितीत वाहनांच्या धडकेने अपघात होतात मृत्यू होतात.

रस्त्यावर किंवा पदपथावर सकाळी पेपरवाले, दुधाचे कॅन, पानाचे ठेले, मोर्चा, शाळेत पोचवायला येणारी वाहने, यामुळे शालेय मुलांना हे सर्व पार करून जातांना दमझाक होते. अशा वेळी पालक व विद्यार्थ्यांचा वाहनांमुळे अपघात होतो.

मद्यपान करून ड्रायव्हिंग करणे व निरपराध माणसांचा मृत्यू हे तर आता नित्याचेच झाले आहे.

काही वेळा ट्रक, डंपर, स्कुटर यांचा वेग वाढवून रस्त्यांतून भरधाव नेतांना कितीतरी माणसं धडकेने मृत्यूमुखी पडतात. जादा सामान किंवा वाजवीपेक्षा जास्त गाडीत प्रवासी असणे, विवाह किंवा तीर्थक्षेत्राहून परत येतांना गाडी उलटणे, बस दरीत पडणे किंवा लाईटच्या खांबावर धडकने अशा बातम्या आपण नेहमीच वाचतो आणि ऐकतो.

ड्रायव्हिंग करतांना मोबाईलवर बोलणे मग धडक नाहीतर खड्ड्यात! काही लोक तर व्यसनासारखे मोबाईलच्या अधिन झाले आहेत. स्पर्धा पुढे जाण्याची मग त्यांत वेगांच भान रहात नाही. आपण सहज पुढील

गाडीच्या पुढे जाऊ. या कल्पनेने गाडी पुढे न्यायची आणि मग आदळते गाडीवर गाडी! नेत्यांच्या जयंत्या, महानिर्वाण दिन, मोर्चे,संप असतात अशा वेळी वाहतूकीचे नियम डावलेले जातात.

पावसाळ्यांत पाणी साचणे, अतिवृष्टीमुळे रस्त्यातं झाडं कोसळणे मग मात्र ट्रॅफिक जाम! अशा वेळी गाडी इकडून-तिकडे काढण्याचा लोक प्रयत्न करतात. पावसाळ्यांत दरवर्षी ओव्हर हेड वायर तुटणे, सोसाट्याचा वारा, वादळ त्यामुळे तसेच झाडे अंगावर पडल्यामुळे मृत्यू होतात. अशा प्रकारे विविध कारणांमुळे रस्त्यांत अपघात होतात. त्यासाठी वाहन चालकांनी नियमांच पालन करावे व जनतेने सहकार्य केल्यास नक्कीच मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या कमी करण्यास मदत होईल.

❋❋❋





# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था






Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!

तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!

# सुरक्षा अभियान
## - घोषवाक्य

२३) होऊ नये दुर्घटनांचे भक्ष्य, गाडी चालवतांना सदा रहा दक्ष.

२४) धोका ओळखा अपघाताचा, गाडीवर नियंत्रण ठेवा योग्यतेचा.

२५) जीवन आहे अनमोल, नका करू मातीमोल.

२६) Don't be hurry,your death will be in hurry.

२७) Don't take shortcut, your life will be cut.

२८) Don't overtake anybody, your death will overtake you

२९) A slip, a slip, a hospital trip.

३०) रक्तदान रुग्णांना करा रस्त्याला नको.

३१) स्वसंरक्षणाची मनी धरू इच्छा, आपल्या हाती आपली सुरक्षा.

३२) छोट्या पुलावर मन मोठे करा, इर्षा टाळा, समोरच्याला आधी जाऊ द्या.

३३) दिसता सिग्नलवर लाल दिवा,वाहनाला ब्रेक लावायलाव हवा.

३४) कराल नशा, होईल दशा

३५) रस्ता सुरक्षेसाठी गोष्ट करा साधी, नेहमी म्हणा 'जा तुम्ही आधी'

३६) अपघात देईल दुःख, सुरक्षा देईल सुख

३७) बेशिस्त पध्दतीने करू नका प्रवास,अन्यथा लवकर लाभेल यमाचा सहवास

३८) हेल्मेट चढवा डोक्याला,मृत्यूला ठेवा दूरवर.

३९) मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक !

४०) नाही पाळले वाहतुकीचे नियम तर नक्कीच भेटेल मिस्टर यम !

४१) येईल जेव्हा शाळा,अतिवेग टाळा. जाऊ दे बाळा, असु द्या कळवळा

४२) नियमानुसार चालवा वाहन, सुरक्षित ठेवा आपलं जीवन !

४३) सर सलामत तो पगडी पचास, हेल्मेट वापरावर ठेवा विश्वास !



# रस्ता सुरक्षेमध्ये शिक्षकांचा सहभाग.. ..

शत्रुघ्न धनाजी ईश्वर

मागच्याच महिन्यात शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांच्या विरोधात झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रस्ता सुरक्षेच्या कामात शिक्षकांचा कितपत सहभाग असावा, नि तो सहभाग कसा असावा हा विचार जरा वेगळ्या दृष्टीने मांडणार आहोत.

मुळातच एखाद्या कामाची काटेकोर




जबाबदारी सोपवली की त्यात औपचारिक कर्तव्याची बंधने येतात. मुळ कामापासून अनुषांगिक कामाची यादी लांबत जाते नि व्यक्ती वैतागतो. या मानसशास्त्रीय सिध्दांताचा आधार घेत रस्ता सुरक्षेसंबधात शिक्षकांचा भरघोस सहभाग मिळवता येईल, त्यासाठी खालील बाबींचा विचार जरूर करावा.

१)एक संस्कार म्हणुन, माणुसकीच्या नात्याने अनौपचारिक पध्दतीने शिक्षकांनी मुलांना रस्तेसुरक्षे संबंधी माहिती, ज्ञान दयावे अशी विनंती शिक्षकांना करावयाची.

२)शिक्षकांनी काही साधने, चित्रे, प्रतिकृती बनवाव्यात अशी उगाचीच अपेक्षा न ठेवता व्यावसायिकांकडून अशी साधने शिक्षकांना पुरवा, त्यांचा वापर शिक्षक करतील.

३)शिक्षकांना रस्ते सुरक्षेसंबधी करावयाच्या कृतीची, प्रयोगाची वेळ शिक्षक,शाळा, सुट्ट्यांचा कालावधी यांचा विचार करूनच ठरवाव.

४)एकवेळ शिक्षकांना मानधन देऊ नका. परंतू रस्ते सुरक्षेसंबधी खोटे कागदी अहवाल मागवू नका.

५)होतकरू, इच्छूक, नि सकारात्मक दृष्टीकोन बाळगणाऱ्या शिक्षकांना हेरून हे काम करून घेतल्यास शिक्षकांचा रस्ते सुरक्षेमध्ये निश्चित सहभाग वाढेल. शासन व स्वयंसेवा यांनी नक्की विचार करावा.

**आजची वस्तूस्थिती.**

ग्रामीण व शहरी भागातील रस्ते सुरक्षेसंदर्भातील परिस्थती वेगवेगळी आहे

तरी या दोन्ही भागातील शाळांमधून विद्यार्थ्यांनी रस्ते सुरक्षेसंबधी जुजबी माहिती दिली जातेच. परिसर अभ्यास, नागरिक शास्त्र या विषयातंगर्त रस्ते सुरक्षिततेचे नियम विदयार्थ्यांना पटवून दिले जात आहे. काही शाळांच्या भितींवर छान- छान चित्राद्वारे, स्लोगन द्वारे रस्ता सुरक्षेचे नियम पटवून दिले जात आहेत, काही शाळामध्ये वाहतूक पोलिसांची व्याख्यानेही आयोजित केली जात आहेत.



या सगळ्या बाबीचा आढावा घेतला तर लक्षात येईल की आजच्या शिक्षकांचा रस्ता सुरक्षेमध्ये शतप्रतिशत सहभाग आहेच.

रस्ता सुरक्षेमध्ये शिक्षकांचा सहभाग का वाढावा...

शिक्षक अनौपचारिकरित्या रस्ते सुरक्षेच्या कामात सहभागी होत आहेतच. तरी एकूण रस्ते अपघात त्यातून निर्माण होणारे प्रश्न यांची दिवसें दिवस वाढणारी संख्या चिंता करण्यासारखी आहे. मृत्यू, अपंगत्व, जीवित व आर्थिक हानी , कुटूंबाची वाताहात .. ही साखळी संपतच नाही. गाड्यांची वाढती संख्या, मर्यादित रस्ते, योग्य प्रशिक्षणाशिवाय वाहन चालवणे ह्या मुलभुत समस्या आहेत. वरून तरूणाईतला वेग, वेगळीच झींग,स्टंटबाजी, अनुकरण, भपकेबाजपणा, मुल्यांचा ऱ्हास याही गोष्टींची भर त्यात पडत आहे. यातील बऱ्याच गोष्टींना प्रबोधनाच्या माध्यमातून नियंत्रित करता येईल. हे प्रबोधन शालेय जीवनातच घडले तर पुढील अनर्थ वेळीच टळतील म्हणुन शिक्षकांचा सहभाग वाढला पाहिजे.

शिक्षक, शाळा, विद्यार्थी ही फार मोठी साखळी आहे. प्रबोधन, शिक्षण यासाठी शाळा ही व्यवस्था अतिशय सुयोग्य आहे. शालेय जीवन संस्कारक्षम, मातीच्या ओल्या गोळयाप्रमाणे असते. याच वयात हे जीवन सुंदर आहे चा अनुभव दिला तर जीवनाचे भान येईल. आपल्यासोबतच इतरांना जीवनाचे मोल कळेल. शिक्षक हे अतिशय तरलतेने, तन्मयतेने विद्यार्थ्यांना पटवून देउ शकतात. म्हणून शिक्षकांचा रस्ते सुरक्षेमध्ये सहभाग वाढत गेला पाहिजे.

गेल्या तीन-चार महिन्यातील शाळेच्या बसमध्ये घडलेल्या अपघातांचा विचार करतांना शिक्षकांच्या रस्ते सुरक्षेमध्ये सहभागाची आवश्यकता अधिकच

अधोरेखित होते. खरंतरं शिक्षकांनी मानवी मुल्यांशी बांधिलकी मानुन हे काम करायला हवे. दुसरे असे की विदयार्थ्यांची आपल्या शिक्षकांवरील निष्ठा हया निष्ठेचा असा विधायक उपयोग करण्यासारखा सुवर्णयोग अन्य नाही.

मात्र एखाद्या दीड शहाण्याने शिक्षकांना वाहतुकीचे नियम शिकविण्यासाठी हातचे अध्यापनाचे काम सोडून रस्त्यावर, चौकात उतरायला सांगितले, पथनाट्य सादर करायला लावली, भिंती रंगवायला लावल्या तर.. .. तेल ही गेले, तुप ही गेले नि हाती .. .. अशी तऱ्हा व्हायची! तेव्हा रस्ता सुरक्षा महत्वाची ते काम कोणाकडून करून घेतो, कसे करून घेतो या बाबी गौण ठराव्यात. फक्त शाळा ही व्यवस्था अधिक अनुकुल म्हणुन रस्ते सुरक्षेमध्ये शिक्षकांचा सहभाग, शिक्षकांच्या संमतीने वाढवला पाहिजे. रस्ते सुरक्षेमध्ये वृदधी करणे काळाची गरज आहे. नवभारताची निर्मिती होतांना यासारख्या मुलभुत समस्या मिटवायला हव्यात.




सुरक्षा अभियान ट्रस्ट
ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०
रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

वाहन चालवताना
मोबाइल वापरणे
म्हणजे टाईमबाँबवर
बसण्यासारखेच !



वेळ आणि काळ सांगून येत नाहीत,
तुम्हीच ठरवा !
Don't Use Mobile
Don't Overspeed

Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!
तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!

# With best compliments from

इंडियान्युजनेट डॉट कॉम

Indianewsnet.com™

The News Portal In Cyber World

## Chief Editor : Dr. Vilas Pawar

# NEWS PORTAL

### Marathi & English

# Safty For All
# All For Safety

# सेवेचा पाझर



यशवंत सुरोशे



महात्मा गांधी हायस्कुलचे गॅदरिंग म्हणजे परिसरातील रसिकांना पर्वणीच असे.भले- मोठे मैदानही प्रेक्षकांना अपुरे पडे. गेली पंधरा वर्षे जानेवारीच्या दुसऱ्या शनिवारी मावळतीचे रंग भरू लागले की रंगमंच प्रकाशाने उजळून निघे. मुला-मुलींच्या नृत्याने, अभिनयाने रात्र रंगत जाई. थंडीची पर्वा न करता प्रेक्षक बक्षिसांना हात पुढे देई. मग दुसऱ्या दिवशी बक्षिस समारंभ. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विदयार्थी नि शिक्षकांचा संस्थेतर्फे सत्कार होई.

या वर्षी कार्यक्रमपत्रिकेवरील गणुतात्यांचे सत्कारमुर्ती म्हणुन नाव वाचून बरीच चर्चा झाली, सर्वांच्या तोडांत एकच वाक्य.. .. गणुतात्यांचा सत्कार दरवर्षी करायला पाहिजे. सर्वानांच आनंद वाटत होता. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी, सफाई कामगार यांना तर गणूतात्यावद्दल आदर होताच. त्यात बरोबर मुले व त्यांचे पालक यांनाही गणूतात्यांचे फार कौतूक वाटे.

गेली वीस वर्षे गणुतात्या संस्थेत नोकरी करतात. गावाहून आलेल्या एका तरूण गरजुला संस्थेने सुरूवातीला रात्रपाळीत वॉचमन म्हणुन काम दिले. ह्याच तरूण गणूतात्याने इमान-इतबारे नोकरी केली. संस्थेचा विश्वास कमावला. संस्थेने त्याला शाळेत शिपाई म्हणून बढती दिली. तिथेही गणुतात्याने विन्रम व प्रेमळ स्वभावाने सर्वाचे मन जिंकले. शाळेच्या कोणत्याही कामाला गणुतात्या नाही म्हणायचे नाहीत. अशीच सात-आठ वर्षे गेली. शाळेचा विस्तार होऊ लागला. शाळा नावारूपाला आली तशी दुरदुरची मुले शाळेत दाखल होऊ लागली, पालकांनी शाळेकडे वाहतुकीची सोय व्हावी अशी मागणी केली. संस्थेने लागलीच स्कुलबस चालू केली तेव्हापासून गणूतात्या स्कुल बसमध्ये मदतनीस म्हणुन काम

करतोय. गेल्या बारा-तेरा वर्षापासून गणूतात्याने मुलांची बाळगलेली सुरक्षितता पाहून प्रत्येक पालकगण, विद्यार्थी भारावून जात. बसमधील प्रत्येक मुलांची गणुतात्या काळजी घेत. बसमधून मुलांना उतरविल्यानंतर रस्ता ओलांडून जायला मदत करीत. सकाळच्या वेळेत गडबड न करता, न चिडता, प्रसंगी मुलाला उचलून, कडेवर घेऊन बसमध्ये चढत. मुलांना हौस वाटे. पालकांना म्हणुन आग्रह धरायचे. गणुतात्या सर्वांना आपल्या परीने मदत करायचा.

आपला सत्कार होणार या बातमीने गणुतात्या अधिकच संकोचले. माझा कशाला सत्कार? मी फुकट करतोय व्हय काम? असे गणुतात्या म्हणायचे.

प्रमुख पाहूणे व्यासपीठावर विराजमान झाले.सर्वांना उत्सुकता




आनंद होई. मग हीच मुले गणुतात्यांच्या सर्व सुचना ऐकत. त्याप्रमाणे वागत. गणुतात्या नेहमी सांगायचे, पोरांनो रस्त्यावरच्या वाहनांकडे लक्ष द्या. घाई करू नका. सिग्नलकडे व्यवस्थित लक्ष दया.. .. बुटाच्या लेस बांधा.. एक ना अनेक.. मुलेही न कंटाळता सूचना पाळायची. म्हणुन आजपर्यंत एकही अपघात गणुतात्यांच्या कारकिर्दीत झाला नव्हता. शाळेच्या इतर बसचे ड्रायव्हर आपल्याला गणुतात्याच मदतनीस म्हणुन हवा होती मिळणाऱ्या बक्षिसांची! यथावकाश बक्षिस समारंभ पार पडला. मग प्रमुख पाहुण्याचे हस्ते गणुतात्यांचा सत्कार झाला. सारे प्रेक्षक उभे राहून टाळ्या वाजवत होते.गणुतात्यांनी सर्वांना हात जोडले नि व्यासपीठावरून उतरू लागले.तेवढ्यात प्रेक्षकांतून आवाज आला. गणुतात्या चार शब्द बोला की .. .. हा.. हा.. हा.. प्रेक्षागृहात आवाज घूमत गेला.

निवेदकाने गणूतात्यांचा हात धरला.

माघारी बोलवले. हातात माईक देऊन बोलण्यास सांगितले. गणुतात्या गडबडले. इकडे-तिकडे बघू लागले. प्रमुख पाहूणेच म्हणाले, बोला गणूतात्या कशी बरे जमते तुम्हाला अशी सेवा करायला?

पाहूण्याचा प्रश्न ऐकुण गणुतात्यांनी सुरुवात केली. मी चार वर्षाचा असेन. माझे बाबा माझ्या लहानपणीच साप चावून वारले होते. माझी आई नी मी एका छोट्याशा घरात रहायचो, घरात मी एकटाच राहील म्हणुन आईने एकदा मला तिच्यासोबत रानात फाट्या गोळा करायला नेले. तिच्या चार- पाच मैत्रिणी सोबत होत्या. मला एका झाडाखाली सावलीत बसून त्या वाळलेली फाट्या गोळा करून भारा बांधत होत्या. दुपार झाली. सर्वांनी आपापले भारे डोक्यावर घेतले. त्यातच कोयते अडकवले. घराच्या ओढीने आम्ही सपासप पायवाटेने हमरस्त्यावर आलो. रस्ता ओलांडून पलिकडे जायचे होते. रस्ता वर्दळीचा होता. गाड्या यायच्या-जायच्या. गाड्या थांबल्या की माझी आई नि तिच्या मैत्रिणी रस्ता ओलांडत. त्यांना या गोष्टीची सवय झाली होती. पण कधी कधी एखादी गाडी अचानक सुप वेगाने येई अशा वेळेस या बाया एकमेकींना ओरडून सावध करत.

पण त्या दिवशी मी सोबत असल्यामुळे माझ्या आईला रस्ता पार करायची घाई झाली होती. मी मागे राहू नये म्हणुन तिला काळजी वाटत होती. ती माझा हात धरून वेगाने रस्ता ओलांडण्यापुर्वी दोन्हीकडे पहायची . पण डोक्यावरच्या जड व लांबलचक भाऱ्यामुळे तिला दोन्ही बाजुकडे व्यवस्थित पाहता आले नसावे. तिने मला ओढत- ओढत रस्त्याच्या  पार नेले. पण तेवढ्यात वेगाने येणाऱ्या वाहनाने आईच्या डोक्यावरील भाऱ्याला जोराची टक्कर दिली. आई भेळकांडली. रस्त्याकडच्या खुंटावर जाऊन आदळली. डोक्यावरचा भारा अंगावर पडला. किती तरी दिवस ती दवाखान्यात होती. पण ती घरी जिवंत आलीच नाही .. .. गणुतात्यांचा स्वर कापत होता. डोळ्यातील पाणी चमकत होते.

आईविना पोरका मी आजीकडे आलो. गावात शाळा नव्हती. परगावी शाळेत पाठवायला आजी तयार नव्हती. ती सारखी माझ्या आईची ही कहाणी मला ऐकवायची.. गणूतात्यांचा कंठ दाटून आला होता. सारा प्रेक्षागृह शांत झाल होता.

म्हणुन मी या लेकरांना सारखं सांगत असतो, पोरांनो जिवाला जपा. पोरं बी ऐकत्यात.. माझ्या आईने मला वाचवण्यासाठी स्वतःचा जीव घालवला, तसाच मी या पोरांचा जीव वाचवणार आहे.

संपुर्ण प्रेक्षागृहात टाळ्यांचा गजर झाला. गणुतात्या हातातला माईक देण्यासाठी निवेदकाला शोधु लागले, सर्वांना नमस्कार करून गणुतात्या खाली उतरले तरी टाळ्यांचा कडकडाट थांबला नव्हता.

❀❀❀




# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था



# चुका आणि शिका



शुभांगी गादेगावकर

आई गं, मेलो... मेलो.. असा आवाज आला. आवाजाच्या दिशेने मी चालू लागले. खरं तरं मी दुध आणायला निघाले होते. तरी का? कोण जाणे? मन मात्र आवाजाच्या शोधात निघाले. आई रागावेल उशीर झाला म्हणुन असे एक मन वाटले, पण क्षणार्धात काय



झाले ते पाहण्याची उत्सूकताही वाढत होती, तो पर्यंत फार मोठा जमाव रस्त्याच्या बाजूला जमलेला मला दिसला. काहीजण फक्त अरेरे! फारच लागले त्याला ऐवढे बोलून तेथून निघून गेले. तर काहीजण आपला या घटनेशी काहीच संबंध नाही असा विचार करत बाजू घेऊन पुढे गेले. काहीजण जे रिक्शात बसले होते, ते रिक्शाचालकांस रिक्शा पटकन चालवत चालवत पुढे नेण्यास सांगत होते. कार मध्ये बसले होते त्यांनी गर्दीतून मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला व ते पुढे गेले. मी मात्र उगाचच मागे पुढे करत होते. मी जात्याच घाबरट. त्यातच रक्त, अपघात पाहण्याची मला भीती वाटे. घाबरटपणामुळे माझी द्विविधा मन:स्थिती झाली. तरी काय झाल? ते पहायचेच होते. जगात माणुसकी संपत चालली आहे. माणसाचा झालेला यंत्रमानव त्याला कारणीभूत असेल. असो.. काहीजण घोळका करून उभे होते तर काहींना फक्त आपल्या कामाचे पडले होते.

शेवटी मनाची तयारी करून मी ही जमावातून पुढे गेले. एक बीस-बावीस वर्षाचा नवयुवक रक्तबंबाळ अवस्थेत पडला होता. रक्ताच्या थारोळ्यात त्याला पाहून मी डोळेच बंद केले. घोळक्यात असणाऱ्या मुलाने तर वमन केले. सगळ्यांनी त्याला तेथून जाण्याची सुचना केली. काहीजण उभे होते .तर काहीना फक्त कामाचे पडले होते.अपघात झालेला नवयूवक तो आता जगाचा निरोपच घेतो की काय? असे मला वाटले. तेवढ्यात पोलिसांची गाडी आली. पोलिसांनी सर्व जमावाला बाजूला

केले. काही लोक ऐकेनात . तेव्हा त्यांना पोलिसी खाक्या दाखविला. यावेळी शहाणपणा हाच की तेथून निघून जाणे. चालता- चालता माझ्या मनात विचार आला काय बरे झाले असावे? खशाने हा अपघात घडला असावा? तसे वाईट वाटण्यासारखे काहीच नाही. असे अपघात रोजच होतात. आज दळण वळणाच्या सोयी वाढल्या आहेत. या सोयींचा गैरफायदा लोक अधिक घेऊ लागले आहेत का? चुक कोणाची होती. अशा एक ना अनेक



प्रश्नांची मनात थैमान मांडले.

घरी पोहोचताच साक्षीचा फोन आला. साक्षी माझी यंदाची कॉलेज मैत्रीण. साक्षी व मी सध्या कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होतो. ती पुर्वी पुण्याला रहात होती. तिच्या वडीलांची बदली झाल्याने ती मुंबईला आली होती. कॉलेजला जाताना आम्ही दोघी एकत्रच जात असू. साक्षीचा आवाज रडवेला होता. साक्षी म्हणाली, मी उद्या कॉलेजला जाणार नाही तु माझी वाट पाहू नकोस. माझ्या भावाला संजिवनी इस्पितळात ठेवले आहे. डोक्याला जखम झाली आहे. हे तर सरकारी इस्पितळ. मग का बरे ठेवले असेल? माझ्या मनात शंका आली. साक्षी पुढे बोलू लागली. त्याचा बाईक अपघात झाला. मग मला वाटले, हाच का तो मुलगा ज्याचा अपघात मी पाहिला. मी तिला अपघाताचे ठिकाण विचारले. ते कळल्यावर माझ्या पायाखालचा जमिनच सरकली, अग! साक्षी हो हो मी त्याचा अपघात झालेला पाहिला.

मी साक्षीला सविस्तर वृत्तांत विचारला. साक्षीचा भाऊ सुरेश उत्तम जलतरणपटू होता. त्याला अनेकदा जलतरण स्पर्धेत पारितोषिकही मिळाले होते, त्याच बरोबर त्याला बाईक चालवण्याची आवड. अगदी भरधाव वेगात तो बाईक नेई. बऱ्याच जणांना बाईक चालवताना भुर्र भुर्र असा आवाज करण्याची आवड . तसा तो ही बाईकचा आवाज करी. तो जवळून गेल्यावर वाऱ्याचा झोका जलदगतीने गेला असे वाटे. आज रविवारचा दिवस. सकाळी उशीरा उठल्यावर सर्वप्रथम वर्तमानपत्र आणण्यासाठी घराजवळील वर्तमानपत्राच्या स्टॉलवर जात होता. नेहमीच्या सवयीने त्याने भरधाव बाईक सुरू केली. बाईक चालवताना तो सतत ती वेडीवाकडी करून रस्ता काढत पुढे जाई.

असाच खेळ करत असताना बाईक घसरली. तोल जाऊन साक्षीचा भाऊ घसरून रस्त्यावर पडला. काही काळ त्याला काही सुचेनासे झाले. त्याने उठून उभे राहण्याचा प्रयत्न केला. त्याला समजले त्याचा डावा पाय फक्त लटकत आहे. डाव्या पायाचे हाड तुटले आहे.पोलिसांनी पंचनामा केल्याशिवाय कोणतेही इस्पितळ सध्या तरी अपघात ग्रस्त व्यक्तीला इस्पितळात घेत नसल्याने रक्तस्त्राव खुप झाला होता. कोणी सदगृहस्थाने पोलिसांना फोन लावला. पोलिसांनी तातडीने जीपमधून त्याला जवळील संजिवनी इस्पितळात दाखल केले. त्याला त्याच्या घरातील वडीलधाऱ्यांचा फोन नंबर विचारला. अचानक सुरेश चा मोबाईल कोणी घेतला माहित नाही असे ओरडू लागला. त्याला बऱ्याच लोकांनी अपघातानंतर गराडा घातला होता. त्यापैकी कोणीतरी त्याचे पैशांचे पाकिट व गळ्यातील सोन्याची चैन ही काढून घेतली. रस्त्यावरील अपघातासाठी पंचनामा होणे गरजेचे त्यासाठी त्याला सरकारी इस्पितळात ठेवले होते. आता त्याला खाजगी रुग्णालयात हलवण्यात येणार होते.

सुरेशच्या डाव्या पायात स्टिलचा रॉड घालण्यात येणार होता. या पुढे तो कधीच पोहू शकणार नव्हता, सुरेश हताश झाला होता. पण आता त्याचा काहीच उपयोग नव्हता. प्रथमच जर सावधानी बाळगली असती तर परिस्थिती इतकी बिकट झाली नसती. मी व माझ्या मैत्रीणी दुसऱ्या दिवशी कॉलेज सुटल्यावर सुरेशला भेटावयास गेलो. त्यावेळी सुरेशला नुकतेच ऑपरेशन थिएटर मधून बाहेर आणला होता. बराच मार लागला होता. डोक्यावर हेल्मेट नसल्याने बरेच टाके पडले होते. तो आता पुर्वीप्रमाणे चालू शकेल की नाही या विचाराने त्याची आई ओक्साबोक्सी रडत



होती. आम्ही सर्व मैत्रिणी तीला धीर देत होतो. तरी तिचा आईचा जीव आईला मुलाचे हाल पहावत नव्हते. त्याची आई मात्र रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांना दोष देत होती. तिचे म्हणणे असे हे पावसाचे दिवस  या दिवसात घसरून पडण्याची भीती अधिक. आपले रस्ते पावसाळ्यात अगदी विचित्र अवस्थेत असतात. रस्त्याना खड्डे पडलेले असतात यामुळे व पाणी साठून राहिल्यामुळे अपघातांची संख्या वाढते.

त्याच वेळी रस्ता सुरक्षा पथकातील एक युवक आमच्या जवळ आला. त्याने आम्हाला रहदारीचे काही नियम सांगितले. दिवसें दिवस अपघात वाढत आहेत. त्याचे खापर सरकारवर फोडून चालणार नाही . रस्त्यावरून चालताना, गाडी चालवताना आपण भारताचे सुजाण नागरिक आहोत या नात्याने सर्वांनी रहदारीचे नियम पाळणे अगत्याचे आहे. बऱ्याचदा काही लहान मुलेही रस्त्यावरून बाईक चालवताना आढळतात. सरकारने जरी अशा मुलांना पकडले तरी अजाण बालके म्हणुन सोडण्यात येते.  नेहमीच काही ट्राफिक पोलिस उपलब्ध असतात असेही नाही. अनेक गल्ल्यांमधून लहान मुलेही गाड्या चालवतात. घरातील वडीलधाऱ्यांनी या घटनेकडे लक्ष देऊन योग्य वयातच वाहने मुलांकडे चालविण्यास सोपवावीत. कशीही भरधाव वाहने चालवणे आपल्या व इतरांच्या जीवितास आवाहन करणारे आहे. हेल्मेट घालण्याची सक्ती सरकारची गरज नसून सरकारला नागरिकांची काळजी आहे. या जाणिवेतून हा नियम तयार झाला. पण केवळ आपला हिरोपणा दाखविण्यासाठी काही मुले हेल्मेटचा वापर करताना दिसत माहीत. भुर्र भुर्र असा आवाज करत भरधाव गाड्या चालवतात.बऱ्याचदा शाळा,महाविद्यालये येथून वाहने नेताना ती कमी वेगाने न्यावीत अशी पूर्व सूचना देणाऱ्या पाट्या रस्त्याच्या कडेला आढळतात. पण या नियमांचे पालन करणारे फारच कमी असतात. बऱ्याच जणांना वाटते नियम हे तोडण्यासाठीच असतात. यातून बरेच मोठे अपघात उद्भवतात. काहीना जिवानिशी जावे लागते. पावसाळ्याच्या दिवसात रस्त्यांचे होणारे खच्चीकरण खरे असले तरी आपला जीव धोक्यात न घालता  गाडी चालवणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

हे ऐकूण सुरेश रडू लागला. तो म्हणाला चुक माझीच होती. यापुढे मी असे करणार नाही. मला चांगलाच धडा मिळाला. मला वाटते सरकारने जे वाहतुकीचे नियम बनवले ते

आपण आपल्यावर सक्ती न समजता आपल्या भल्यासाठीच आहेत अशी जाणीव ठेवल्यास असे अपघात घडणार नाहीत. वाहतुकीच्या नियमांचे योग्य पालन केल्यास स्वच्छ. सुंदर व सुरक्षित भारत पहावयास मिळेल. देवाने आपल्याला एवढे अमूल्य अवयव दिले. त्यांची काळजी घेणे हे आपलीच जबाबदारी आहे. आपल्याच सोयीसाठी सामाजिक जाणिवेतून सरकारने रस्ते तयार केले आहेत. सरकार ही एक आपल्यावर अंकूश ठेवणारी यंत्रणा आहे, पण या यंत्रणेला प्रभावी अस्त्वि आपल्या सर्वाच्या प्रयत्नामुळेच मिळणार आहे. अपघात का होतात?त्यावर योग्य उपाययोजना काय? हे समजून सर्वांनी सावधानी बाळगल्यास नक्कीच अपघातांचे प्रमाण कमी होईल.

❇❇❇


**सुरक्षा अभियान ट्रस्ट**

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था



DRIVE RASH... END UP IN CRASH

Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!

तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!




# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था





# खड्ड्यात रस्ते की रस्त्यांत खड्डे

चारुलता कुळकर्णी

गेल्या वर्षी पाऊस पडायला सुरूवात झाल्यावर काही दिवसांतच मुंबईत जागोजागी खड्ड्यांच साम्राज्य सुरु झालं. रस्त्यांवरील खड्ड्यामुळे वाहन चालक आणि प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. रस्त्यांवरील खड्ड्यामुळे प्रवाशांचा जीव जात असला तरी शासनाला त्याचे काहीही सोयर सुतक नाही.

अशा खड्डेमय रस्त्यावरून वाहन चालवितांना वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. खड्डेमय रस्त्यांतून वाहनांतून प्रवास करतांना प्रवाशांना तसेच शालेय मुले- मुलीनांही असंख्य शारिरीक यातना सहन कराव्या लागतात. गेल्या वर्षी पावसाळ्यात अनेक रस्ते असंख्य लहान-



मोठ्या खड्ड्यांमध्ये हरवून गेले आहेत. परिणामी रस्त्यांत खड्ड्या की खड्ड्यांत रस्ता असा प्रश्न नागरिकांना पडतो. दरवर्षी नवी मुंबईतील डांबरीकरण युक्त रस्ते खड्ड्यांत हरवून जातात. एवढेच नव्हे तर सायन-पनवेल, ठाणे, डोंबिवली येथे असंख्य खड्डे पडतात. यावरून रस्त्यांचा दर्जा कसा आहे

तर प्रत्येक वर्षी हिच कमी-जास्त प्रमाणांतील दुखणं आहे. प्रवाशांच्या जीवाची पर्वा असती तर शासनाने महामार्गावर पडलेले खड्डे तत्परतेने दुरुस्त केले असते. पण तसे झालेच नाही ह्यावरून शासन-प्रशासन रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्याबाबत किती उदासिन आहे, ह्यांचा प्रत्यय येतो.

याचा अंदाज येतो. पावसाळ्यापर्यंत पूर्ण खड्डे बुजविले जात नाहीत. पून्हा पावसाळा आला की, हेच दुखणं हिच रड चालू होते. त्यामुळेंच दरवर्षी डेंग्यू, हिवताप यांसारखे साथीचे रोग सुरू होतात. दरवर्षी पावसाळ्यांत रस्त्यांवर खड्डेच खड्डे पडतात. असा मुंबई , नवी मुंबई, ठाणेकरांना प्रदिर्घ अनुभव आहे. प्रत्येक ठिकाणी महापालिका दरवर्षी लाखो रुपये पाण्यासारखे खर्च करते तरीही नतीजा ठण ठण गोपाल ! नागरिकांना काही रस्ते पावसाळ्यांत खड्ड्यामध्ये शोधावे लागतात. महापालिका रस्ते बांधण्याचे काम खाजगी कंत्राटदारांना देते.मात्र रस्त्यांचा दर्जा सुधारत नाही. महापालिका अधिकारी कर्मचारी व रस्ता बांधणारा कत्रांटदार यांच्या हितसंबधामुळे रस्त्याच्या कामावर व्यवस्थित देखरेख ठेवली जात नाही. परिणामी दरवर्षी रस्ते खड्डेमय होतात मग रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी खर्च केला जातो. नागरिकांना खुप त्रास होतो. अपघात होतात, नागरिकांना जीव गमवावा लागतो. जो पर्यंत कंत्राटदार यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे.



दरवर्षीचा खड्ड्यांचा अनुभव असून सुध्दा महापालिका पावसाळ्यांत रस्त्यावर खड्डे पडू नयेत यासाठी ठाम उपाय योजना करीत नाही. २१ व्या शतकांतील सुनियोजित शहर म्हणून मिरविणाऱ्या मुंबई-ठाणे-कल्याण नवी मुंबई येथील रस्ते भिरभिरणाऱ्या पावसामुळे खराब होतात ही बाब नक्कीच माझ्यामते भुषणावह नाही. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारे अपघात रोखायचे कोणी हाच प्रश्न सतत नागरिकांना पडतो.

कोट्यावधीचे बजेट असलेली ठाणे महापालिका रस्त्यांतील खड्डे बुजविण्यासाठी दुर्लक्ष करते. पावसाळ्यांत रस्त्यांत चौकांत खड्डे पडतात. पाणी साचतं. चुकीच्या कार्यपध्दतीमुळे रस्त्यांची चाळण होते. रस्ते अरुंद असून त्यांत खड्डे! दिवसेदिवस वाहनांची संख्या वाढतेय, त्यामुळे प्रत्येक ठिकाणी वाहनांची कोंडी होते. अपघात होतात. प्रत्येक ठिकाणी सतत वाहतूक असणाऱ्या रस्त्यांवरील फुटपाथ प्रंचड उंच असून नागरिक वर चढण्याचा कंटाळा करते

अशा वेळी अपघात होतात. सहजासहजी ज्येष्ठ नागरिक फुटपाथवर चढूच शकत नाहीत. उदा. टेंभी नाका ते जांभळी नाका तेथेंच शिवसेनेचे कार्यालय आहे. जरी कसेबसे हात धरून चढलोत तरी प्रत्येक दुकानदाराची कामे फुटपाथवरच असतात. प्रत्येक वेळी हीच अडचण उद्भवते फुटपाथ चालण्यासाठी मोकळा ठेवून त्यांची उंची कमी केल्यास अपघात टळतील असं वाटतं.

पावसाळ्यांत प्रत्येक ठिकाणी खड्डे सांचून पाणी तुंबलेले असते अशा वेळी नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अशा सतत वाहतुकीच्या रस्त्यांवर साधी मलमपट्टी करून फायदा होत नाही. सायंकाळच्या वेळी वाहनांच्या प्रचंड गर्दीतून, खड्ड्यांतून वाट काढणाऱ्या वाहन चालकांसाठी हे खड्डे जीवघेणे ठरत आहेत.

गेल्या वर्षी तर गौरी गणपती मिरवणुक तर खड्ड्यांतून झाली. जागो जागी खड्डे बुजविण्यासाठी पालिकेने खडीचा वापर करून मलमपट्टी केली पण दोन दिवस पाऊस पडल्यामुळे सर्व खडी वाहून गेली. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे काही बुजत नाही. खड्ड्याविरोधात आंदोलन करून लोंकानी आपला संताप व्यक्त केला. एवढंच नाही तर आंदोलकांनी आठ दिवसांत खड्डे बुजले नाहीत तर नवव्या दिवशी आणि रस्ते खणायला सुरुवात करू ! असा इशारा दिला तरी काही फरक पडला नाही.

खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी सगळीकडे दिसून येत. नागरिकांची अवस्था म्हणजे हा एक प्रकारे वाहतूक कोंडीच्या चक्रव्युहात अडकलेल्या अभिमन्यूसारखी झालेली बघायला मिळते. रस्त्यावर पडलेले मोठ मोठे खड्डे, फेरीवाल्यांनी अडवून ठेवलेले फुटपाथ, भैये लोकांनी अडवून ठेवलेले रस्ते आणि त्यात भरीत भर म्हणून खोदून ठेवलेले रस्ते व अरूंद रस्ते साधे चालायचे झाले तरी पादचारी मार्ग देखील धड नाही? त्यांत परत वाहनांच्या लांबच लांब रांगामुळे वाहन चालक अक्षरशः मेटाकुटीला येतात.

सहा महिन्यापुर्वी बांधलेल्या रस्त्यांची परिस्थिती कमकुवत होवो तर खड्ड्यांची नोंद पहिल्या पावसापासून करणे. रस्ते बांधणीच्या कामात आर्थीक गैर व्यवहार होणे हे रस्त्यांचे आजार तसे खुपच जुने आहेत. कुठल्याही सार्वजनिक उत्सवासाठी उदा. नवरात्र, गणेशोत्सव, उद्घाटन इत्यादीसाठी चक्क रस्त्यांत मंडप बांधले जातात त्यामुळे रस्त्यांची चाळण होते.

आपण दरवर्षीप्रमाणे अपेक्षा करावी की यावर्षी तरी खड्डेमुक्त रस्ते बघायला मिळतील.




# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था**



# रस्ते सुरक्षा



सुभाष वस्त

मानवाच्या मुलभुत हक्क अन्न, वस्त्र, निवारा या हक्कासाठी प्रत्येक जण दिवसें दिवस झटत असतो. मुलभूत हक्कांची सुरक्षा कशी घेता येईल याची दखल घेत असतो. जीवन सुरक्षित रहाण्याच्या दृष्टीने जीवन सुरक्षा पॉलिसी आर्युविमा महामंडळाने सुरू केली आहे. वरील बाबींची सुरक्षा आपापल्या स्तरावर घेत असतो.



इन्फास्ट्रक्चर मधील रस्ता सुरक्षा हा सुध्दा प्रत्येकाच्या जीवनातील महत्वाचा घटक आहे. रस्ते सुरक्षा वैयक्तिक स्वतः घेऊ शकत नाही. शहराप्रमाणे खेड्यातील रस्त्यांचा विकास शासनाने करून खेड्यांचा संपर्क रस्त्यामुळे साधला आहे. वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी बायपास काढण्यात आलेले आहेत. रस्ते बांधण्यात आले परंतू त्याची सुरक्षा ठेवण्यात येत नाही. रस्त्यांवरील लहान, मोठे खड्ड्यामुळे पायी चालणाऱ्यांना तसेच वाहनांने चालणाऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. पावसाळ्यात तर सर्व रस्त्यांची दुर्दशा होऊन महामार्गावर मोठी अवजड वाहनाने मोठे खड्डे निर्माण होऊन, वाहने नादुरुस्त होतात. रस्ते सुरक्षा अभावामुळे माणसांची हाडे खिळखिळी होतात. माणसाची काय गणपती सारख्या महान देवाचीही सुटका नाही. रस्ते सुरक्षाकडे दुर्लक्ष होत असल्याने नाहक मनुष्यवधास बळी पडल्याचा गुन्हा नोंदविण्यात आल्याची उदाहरणे वृत्तपत्रात वाचण्यात येतात.

वरील वस्तूनिष्ठ वस्तुस्थिती शासनाचे रस्ते दुरूस्ती विभागास अवगत असून सुध्दा दुर्लक्ष केले जाते. जनता रस्त्यांवर आल्यावर तात्पुरती मलमपट्टी निघून जाते. निधीची कमतरता हे कारण सांगण्यात येते. काही वेळा निधी पुरेसा उपलब्ध होऊनही रस्ते सुरक्षा पुर्णपणे केली जात नाही. रस्ते सुरक्षासाठी मिळालेला निधी पुर्णपणे वापर न

करता कमी दर्जाचे साहित्य वापरून ठेकेदार व पर्यवेक्षक प्रमाणशिल बांधणी करीत नाही. हवाई मार्ग, जलमार्ग व रस्ते मार्ग या तीन मार्गपैकी  केवळ रस्ता मार्गाचीच सुरक्षा वेळोवेळी घेणे आवश्यक आहे. दिवसें दिवस गावापासून शहरापर्यंत वाहनांची संख्या अमर्याद वाढत आहे. मात्र रस्ते दुरुस्तींची



संख्या वाढत नाही. सततच्या वाहनांच्या वर्दळीमुळे रस्त्यांचे  जीवन कमी होत असून माणसांचे जीवनही कमी होत आहे.

केंद्र शासनामार्फत समृध्दी योजनेअंतर्गत मुंबई नागपुर महामार्ग तसेच वडखळ अलिबाग महामार्ग चौपदरीकरणाची कार्यवाही सुरू आहे. हे स्तुत्य आहे. परंतू त्यासाठी गरीब शेतकऱ्यांच्या अनेक वर्षापासूनच्या जमिनी, घरे, उद्योग धंदे नष्ट करून बेघर करणार आहेत. माणसाचे मुलभूत हक्क हिरावून घेण्यापुर्वी त्यांना त्यांचे हक्क प्रथम मिळवून देऊन नंतरचा विकासाचा विचार करावा. कितीही रस्त्यांची बांधणी, बायपासची निर्मिती केली तरी वाढती वाहनसंख्याचा प्रश्न सोडविणे कठीण आहे. कृषिप्रधान मानणाऱ्या भारत देशात प्रथम उद्योगधंदे निर्मितीमुळे शेती कमी होत जाऊन रस्ते विकासामुळे शेती कमी होत जाऊन आता रस्ते विकासामुळे शेती अधिकाधीक कमी होत आहे. त्यामुळे आपला भारत देश कृषीप्रधान राहण्याची शक्यता  भविष्यात कमी होईल अशी शंका येते. भारतात उत्तम रस्ते बांधले जातात. परंतू त्यांच्या देखभालीसाठी मात्र आपण कमी पडतो. रस्ते बांधणे बरोबरच त्याच्या देखभालीसाठी निधीचा वापर केला पाहिजे.

भविष्यात भारतात स्थलांतराचे वाढते प्रमाण पाहता पायाभूत सुविधांवर (इन्फास्ट्रक्चर)रस्ते सुरक्षावर भर दिला पाहिजे. रस्ते सुरक्षेसाठी निधीची कमतरता भासल्यास केंद्र व राज्य सरकारवर अवलंबून राहण्यापेक्षा स्थानिक यंत्रणेने वा महानगरपालिकेने प्रापर्टी टॅक्स मधून पैसा वापरावा. जीवन सुरक्षा पॉलिसीप्रमाणे शासनाने जास्त टक्के व्याजाने रस्ते सुरक्षा पॉलिसी जाहिर करावी जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना पैसे  गुंतवणुकीची संधी प्राप्त होईल.

रस्ते सुरक्षा ही बाब दुय्यम न समजता परदेशातील रस्ते दुरुस्तीसाठी वापरण्यात येणारे उच्च प्रतिचे साहित्य पुरेसा निधी, कुशल तंत्रज्ञ भ्रष्टाचार रहित योग्य व्यवस्थापन होणे जास्त गरजेचे आहे. या बाबी वरिष्ठ पातळी पासून खालच्या पातळीपर्यंत कटाक्षाने पाळण्यास रस्ते सुरक्षिततेचा मार्ग सुकर होऊन वारंवार रस्ते दुरुस्तीची वेळ येणार नाही त्यामुळे वाहने व प्रवासी सुरक्षित राहून त्यांचे जीवन वाढेल. परदेशाच्या प्रमाणात काही अंशी आपला महान भारत देश, अधिक महान झाल्याशिवाय राहणार नाही यात तीळमात्र शंका नाही.

❇❇❇




**सुरक्षा अभियान ट्रस्ट**
ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०
रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था




Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!
तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!




# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था



# वाहतूक स्तोत्र

सदैव माणसा, पुढे पुढे चलायचे
नियम मोडून कधी, ना माघारी यायचे

सोडून शिस्त कधी , ना रस्त्यात बागडायचे
नीट सिग्नल बघून, मुकाट जायचे

नो-एन्ट्री मध्ये कधी ना घुसायचे
जो घुसेल त्याला, मागे परतवायचे



एकाच मार्गावरी, जीवनात चालायचे
वन-वे वर सुध्दा हेच पाळायचे

कर्कश भोंगे वाजवून, ना खराब करायचे
पावित्र्य बिघडून शाळा, हॉस्पिटलचे

चालविताना वाहन कधीच ना प्यायचे
डोक्यावर घ्यायचे ओझे हेलमेटचे

करून तपासणी वाहनाची, पार पाडू कर्तव्य ज्न्माचे
भान राखता येइल तेव्हा समतोल पर्यावरणाचे

केले पालन काटेकोर सर्वांनी नियंमाचे
करू सहकार्य वाहतूकीला एकमेकांच्या सुरक्षेचे.

**-श्रीप्रकाश सप्रे.**

# सुरक्षा मंत्र

ऐक मानवा सांगतो मंत्र
जगण्याचे हे नवीन तंत्र
जीव सलामत तर स्वप्न हजार
ध्यानी ठेव न होता बेजार

सत्य बोलणे टाकून द्यावे
गोड बोलणे तोंडी बाणावे
स्पष्ट बोलण्याची नको घाण
तोंडी त्यापेक्षा कुलूप छान

व्हॅट्सऍपची रणी लढू नये
उगाच भानगडीत पडू नये
रोष कुणाचा घेउ नये
पोलिसांना आमत्रंण देउ नये

आपुली मते आपल्यापाशाी
बोलला कुठेतर रहाल उपाशी
कान, डोळे बंद करावे
सरळ रस्ता नापित जावे



भाग्य आपुले जगण्या देती
आयुष्य आपूले गुंडा हाती

हवेवर ना टॅक्स घेती
श्वास देणे त्यांच्या हाती

मान अपमान गिळुन घ्यावा
आणि सुटकेचा ढेकर द्यावा

चेहरा सदा आनंदी असावा
देशाचा अभिमान दिसावा

किडामुंगीसम आयुष्य जगावे
दांडग्यापायी चिरडून घ्यावे

चौऱ्यांशी योनीतून मुक्त व्हावे
चिरडणाऱ्याचे उपकार मानावे

ध्यानी ठेवा सुरक्षा मंत्र
जगणे होईल सुरळीत यंत्र

यंत्र चालले दुसऱ्या हाती
बंद करणे आपुल्या माथा

**-अरूण पाटील**

# वाहतुकीची शिस्त

रस्ते, वाहतूक नि प्रदुषण
यांची ऐकायची आहे कथा ?
पण शिस्त हवी प्रत्येकास
ही का फक्त प्रशासनाचीच व्यथा ?



डावीकडूनच चालायचे असते रस्त्यावर
ओलांडताना रस्ता, डावीउजवीकडे टाकायची नजर !
पण चालणार्यांनीच बसवलेत नियम आता धाब्यावर
जेव्हा येऊन बसलेत मोबाईल यांच्या कानांवर ।।

बेभान गाडी चालवणारा हा चालक
स्वत:स समजे जणू रस्त्याचा मालक।
बस पकडण्यास आबालवृध्द धावती
टिंग टिंग करत फक्त मजा पाहे वाहक।।

तरी बरं, मुजोर रिक्षेवाल्यांची दादागिरी
आलीये आता जरा जागेवर।
सुशिक्षित समाजाला समाधान मिळते
ओला, उबेरच्या टॅक्सीत बसल्यावर।।

रिक्षा असो वा कोणतीही गाडी
चालविण्यास असावी शिक्षणाची आडकाठी।
लायसन्ससाठी तर परिक्षा असावी कठीण मोठी
मग शिस्त लावण्यास पोलिस का उगारतील उगा काठी ?

**-रश्मी चौधरी- वाघमोडे**

# अपघाताचे नाव घातपात

आजकाल सर्वांनाच
पुढे जायची घाई
म्हणुनच की कोण कोणाचा
जीव घेई ?

आजकाल झाले सर्वजण
महागाईने त्रस्त
फक्त जाले मात्र
मरण आपुले स्वस्त

जीवनाचे ध्येय बदललेले
अपघाताच्या घाताने

आयुष्याचे रूप बदलले
अपघाताच्या घावाने

अवयवाचे दान दिले त्या
अपघाताच्या राक्षसाला
आयुष्याचे व्यंग होऊनी
बसे मानगुटीला

अपघात हा असेल का घातपात ?
आणि घातपात हा असेल निव्वळ अपघात !

**-गिरीजा पागनीस**


**सुरक्षा अभियान ट्रस्ट** ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

**रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था**




Your Safety, Secures Your Family! Please Be Cautious on Road!

**तुमची सुरक्षा हीच कुटुंबाची सुरक्षा, कृपया रस्त्यावर सतर्क रहा!**

# इको ड्रायव्हिंगची आवश्यकता



### इको ड्रायव्हिंग म्हणजे काय?

१) इको ड्रायव्हिंग म्हणजे कमीत कमी इंधनात जास्तीत- जास्त वाहन कसे जास्त चालविता येईल याची माहीती घेणे.

२) वाहन चालविण्याच्या पध्दतीत सुधारणा करणे.

३) वाहनाची योग्य निवड, वापर आणि त्याची दुरुस्ती करणे.

### इको ड्रायव्हिंग का करावी?

१) इको ड्रायव्हिंग मुळे इंधनाची कार्यक्षमता ५%ते ३३% पर्यंत वाढविली जाते. त्यामुळे इंधनाचायोग्य मोबदला मिळतो.

२) इंधनाची म्हणजे उर्जेची बचत होते.

३) पैशांची बचत होते.

४) तूमचे आणि तुमच्या संस्थेचे पैसे वाचू शकतात.

५) सुरक्षित ड्रायव्हिंग करण्याची सवय आपणास लागू शकते.

६) प्रदुषणाचे प्रमाण कमी होऊ शकते.

### इको ड्रायव्हिंग कसे करावे.

इंधनाच्या खर्चावर परिणाम करणाऱ्या तीन गोष्टी पुढील प्रमाणे.

१) **सरावः** दोन ड्रायव्हरची गाडी चालविण्याची पद्धत एक सारखी नसते. त्यामुळे गाडीच्या एरहरेज मध्ये बदल दिसून येतो.

२) **कार्यपद्धतः** एक सारख्या गाडया ज्या प्रमाणे वापरल्या जातात आणि ज्याप्रमाणे काळजी घेतली जाते त्याप्रमाणे त्या वेग-वेगळा खर्च काढतात.

३) **उपकरणः** गाडी घेतांना त्याच्या ड्राईव्हची (power transmission)

माहीती/फायदा लक्षात घेऊन त्याची निवड केली पाहिजे.

## इको ड्रायव्हिंगचा सराव:

१) वाहनाची गती कमी करून गाडी चालविली पाहिजे km/hr

२) एक सारख्या गती मध्ये वाहन चालविले पाहिजे. आवश्यकता नसल्यास त्याच्या स्पिड मध्ये सतत चढउतार करू नये.

३) गाडी चालवितांना योग्य गिअरची निवड केली पाहिजे तसेच ॲक्सीलरेटर च्या सहाय्याने थ्रोटल पोझीशन वर नियंत्रन ठेवले पाहिजे.

४) कमीत कमी खर्चामध्ये जास्तीत- जास्त गाडी चालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

५) जास्त वेळ गाडी आयडियल स्पिड मध्ये चालू ठेऊ नये.

६) कमी वेळेत शॉर्ट-कर्ट (जवळच्या) रस्त्याने कसे जाता येईल याचे प्लानींग केले पाहिजे व त्या नुसार प्रवास केला पाहिजे.

## सरावाची माहिती आणि वाहन चालविण्याच्या सवयी:

१) वेगावर नियंत्रण ठेवा.

२) ज्या प्रमाणे रस्ता आहे त्या प्रमाणे वाहनाची गती बदलली पाहिजे.

३) तुमच्या गाडीचा योग्य (जास्तीत जास्त) वेग ४५ ते ६० km/hr असावा.

४) त्यामुळे तुमच्या इंधनाची ७% ते १०% बचत होते.

## सातत्यपूर्ण व अटकळीचे ड्रायव्हिंग:

१) एकाच गतीत वाहन चालविल्यास तूमच्या इंधनाची बचत होईल अन्यथा गाडीच्या गतीत थोडासा बदल केल्यास तुम्हाला एव्हरेज मध्ये बदल जाणवेल.

२) गाडी चालू करणे किंवा थांबवणे सोपे जाईल.

३) अडथळा दिसताक्षणी गाडी थांबविण्याचा प्रयत्न करा.(ॲक्सीलेटर कमी करा) अन्यथा तुम्हाला वाहन थांबविणे अवघड जाईल.

४) गाडी चालवितांना दोन वाहनामध्ये योग्य अंतर ठेवा.

५) समोरील गाडीच्या एकदम मागे स्पर्श करून गाडी चालवू नका, गाडी चालवितांना समोर पहा.

६) ट्राफिक च्या सिंग्नलचे उल्लघंन करू नये.

७) अचानक ब्रेक मारणे टाळा.

८) सुरक्षतेचे संदर्भात काळजी घ्या.

९) डॅश बोर्ड वरील चिन्हांची ओळख करून घ्या.

## निष्क्रिय

जी गाडी चांगली आहे. ती चालू केल्यानंतर हलकी सुरुवात करण्याची आवश्यकता नसते.

१. लहान मुलांच्या खेळण्याचे ठिकाण असल्यास तुमची गाडी त्या ठिकाणी ३० सेकंदापेक्षा जास्त वेळ Idlinig speed मध्ये ठेवू नका.

२ तुमची गाडी चालु करण्यासाठी जेवढे इंधन खर्च करत नाही त्या पेक्षा जास्त इंधन गाडी Idling मध्ये असल्यास खर्च करते.

३. जर तुमची गाडी २ मिनिट Idling speed मध्ये चालु ठेवल्यास जितके फ्युएल खर्च करते. तितक्याच फ्युएल मध्ये तुमची गाडी साधारणतः १.६०९ कि.मी अंतर कापु शकते.

४. जास्त वेळ गाडी Idling speed मध्ये चालू ठेवल्याने इंजिनच्या पार्टस्ची झीज होते आणि जास्त प्रमाणात प्रदुषण होते.

## इंधन जास्त खर्च होण्याची कारणेः

१) ए.सी. चालविल्याने साधारणतः ५-२५ % इंधन जास्त खर्च होते.

२) गाडीचा आकार हवेला कापणारा असला पाहिजे.

३) गाडी पार्कींग करताना सावली मध्ये केली पाहिजे. ज्यामुळे ए.सी. चालू केला असता कुलिंग लवकर होईल आणि इंधन कमी खर्च होईल

४) गाडी मध्ये क्षमते पेक्षा जास्त वजन भरून गाडी चालविल्यास गाडी जास्त इंधन खर्च करते.

५) टायर मध्ये हवेचे योग्य प्रमाण नसल्यास.

६) गाडी सुरू झाल्यानंतर साधारणतः ५० km/hr पर्यंत ए.सी. चालू करू नये, या वेळी विंडो ओपन ठेवाव्यात.

७) गाडीचा स्पीड ४० च्या वर गेल्यास ए.सी. चालू करावा, या वेळी विंडो बंद कराव्यात.

८) गाडीचे ऑईल वेळच्या वेळी न बदलल्यास.(गाडीचे ऑईल साधारणतः १०,००० km नंतर बदलावे.)

९) गाडीचा एअर फ्लिटर वेळच्या वेळी स्वच्छ करावा. (साधारणतः३०,०००km नंतर बदलावा.)

१०) व्हील अलाईनमेंट न करणे. (व्हील अलाईनमेंट साधारणतः१०,००० km नंतर करावी.)

११) प्रीव्हेन्टीव्ह मेंन्टेनेन्स न करणे.

१२) O2 सेन्सर खराब झाल्यास.

१३) OBD सिस्टीम व्यवस्थित काम करत नसल्यास.

१४) व्हील बेअरींग ग्रिसींग न केल्यास.

१५) ब्रेक सेटिंग जास्त असल्यास.

१६) हॅन्ड ब्रेक ऑपरेट असतांना गाडी चालविल्यास.

१७) क्लच पॅडलवर पाय ठेवून गाडी चालविल्यास.

१८) गाडी चालविताना रोडनुसार योग्य गिअरचा वापर करावा

१९) इंजिन लाईट दर्शवित असल्यास लक्ष द्या.

२०) पेट्रोल टँक कॅप व्यवस्थित घट्ट करा.



१)	डावी कडून पुढे जाल, असुरक्षेचे बळी व्हाल

२)	नाही पाळला नियम, अपघाती जिवन कायम

३)	वाहतुकी नियमांचे उल्लंघन, म्हणजे अपघातास आमंत्रण

४)	काहुर विचारांचे ठेवाल, तर अपघाती पस्तवाल

५)	निष्काळजीपणे चालवतो वाहन, म्हणून वाढते अपघाताचे प्रमाण

६)	नाही पाळला नियम, अपघाती जीवन कायम

७)	गप्पा रहदारीच्या रस्त्यावर, तर बेतेल तुमच्या आयुष्यावर

८)	खात्री शिवाय पुढे जाऊ नका, घाईचे बळी होऊ नका

९)	करा हेल्मेटचा वापर, असुरक्षितता जाईल दूरवर

१०)	नका घेऊ दुसऱ्याची गती, नाही तर व्हाल अपघाताचा सोबती

११)	नका करू नजर विचलीत, मिळेल अपघाती फलीत.

१२)	निवड करा एकाची, दारू पिण्याची अथवा ड्रायव्हिंगची!

१३)	वेग कमी जीवनाची हमी.

१४)	आवरा वेगाला सावरा जीवाला

# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क. इ-३९५०

**रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था**



# रस्ता सुरक्षा नियम



**वाहन चालक**

१)वाहन चालकास ५ वर्ष चालवण्याचा अनुभव व बॅच प्राप्त प्रशिक्षीत असावा.

२)निर्व्यसनी, निरोगी, वैयक्तिक स्वच्छता, टापटिपपणा व शुध्द चरित्र्य असणारा असावा.

३)वाहन चालकाने प्रवासी वाहतूकीचे सर्व नियम काटेकोरपणे पाळणे बंधनकारक आहे.

४)प्रथमोपचार व अग्निशमनाचे प्रशिक्षण प्राप्त असावे.

**वाहनासोबत बाळगावयाची कागदपत्रे**



१)वाहनाचे वैध प्रमाणपत्र, कर, विमा, परवाना, योग्यता प्रमाणपत्र, पीयुसी, चालकाचे लायसन्स व बॅच

२) विद्यार्थ्याचे नाव, पत्ता,फोन/मोबाईल नंबर, रक्तगट इ. यादी.

**वाहन चालकाचे कर्तव्य**

१)वाहनाची दैनंदिन देखभाल करावी.

२)वाहनाचे डॅशबोर्डवरील सर्व मीटर कार्यरत असल्याची खात्री करावी.

३)वाहनाची इंधन गळती, ब्रेक कार्यक्षमता,टायर्सची स्थिती नियमीत तपासावी.

४)बस लेन मधूनच प्रवास करावा.

५)विद्यार्थ्यांची संख्या नोंदणीकृत क्षमता महाराष्ट्र मोटार वाहन नियम १०६ मध्ये विहीत केल्याप्रमाणे १२ वर्षाच्या आतील विद्यार्थ्यांना २ आसन क्षमता असणाऱ्या सीटवर ३ विद्यार्थी व ३ आसन क्षमता असणाऱ्या सीट वर ४ विद्यार्थी.

६)वाहनात विद्यार्थ्यांनी विसरलेले सामान शाळेध्ये जमा करावे.

७)योग्य थांब्यावर व शाळेतील आवारात विद्यार्थी वाहनात घेणे व उतरवणे.

### परिचर (मदतनीस) कर्तव्य

१)प्रत्येक वाहनात परिचर(मदतनीस) असणे बंधनकारक आहे. जर वाहनात विद्यार्थीनी असतील तर महिला परिचर (मदतनीस) असणे बंधनकारक आहे.

२)विद्यार्थ्यांना उतरताना / चढतना व रस्ता पार करताना वाहतूकीचे नियम पाळुन मदत करणे.

### बस मधून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची जबाबदारी

१)रस्त्यावर आणि बस स्टॉपवर खेळु नये.

२)अनोळखी व्यक्तीशी बोलू नका किंवा त्यांच्याबरोबर प्रवास करू नका.जर बोलायचेच असेल तर अंतर ठेवून मोठ्याने बोला.

३)वाहना मध्ये चढतना किंवा उतरताना बॅग किंवा कपडे अडकणार नाहीत याची काळजी घ्या.

४)स्कुल बस पुढे निघून गेल्यानंतरच रस्ता क्रॉस करा.

५)वाहनात गोंगाट करू नका किंवा भांडू नका.

६)वाहनातून शरीराचा कोणताही भाग बाहेर काढू नका.

७)वाहनाच्या आतील मार्गात कोणतीही वस्तू/ बॅग चालण्यास अडथळा होईल अशी ठेवू नका

### पालकांनी लहान मुलांची घ्यावयाची काळजी

१)पालकांनो! मुले अनुकरणप्रिय असतात. कृपया मुलांसोबत वाहतूकीचे नियम पाळून आदर्श निर्माण करा.

२)मुलांना रस्ता सुरक्षिततेची जाणीव करून देणे महत्वाचे आहे.

३)रस्ता सुरक्षेचा धडा हा घरातूनच




बिंबवा.

४)रस्त्यावर चालताना लहान मुलांसोबत पालकांनी रहावे.

५)पालकांनी मुलांच्या शालेय वाहतूकीसाठी सुरक्षित वाहनाचाच वापर करावा.

६)शक्यतो शालेय बसचाच वापर करावा अथवा कार, रिक्षामधून वाहतूक करताना आसन क्षमतेपेक्षा दीडपट मुलांची वाहतूक करण्यावर ठाम रहावे.

७)मुलांना रस्त्यावर खेळण्यास मनाई करावी.

**मुलांनो, रस्त्यावरून चालतांना**

१)फुटपाथचा वापर करा. फुटपाथ नसल्यास रस्त्याच्या उजवीकडूनच चाला. त्यामुळे समोरून येणारी वाहने नीट दिसतात आणि रहदारीचा आपल्याला अंदाज येतो.

२)अधे-मधे रस्ता ओलांडू नका, झेब्रा-क्रॉसिगवरूनच रस्ता ओलांडा

३)रस्ता ओलांडतना प्रथम उजवीकडे, नंतर डावीकडे पाहून, वाहन येत नाही याची खात्री करून, मगच रस्ता



ओलांडा.

४)रस्ता ओलांडतना अचानक वाहन आल्यास गडबडून न जाता जागेवरच थांबा.

५)थांबा पहा आणि मगच रस्ता ओलांडा या मंत्राचे कृपया पालन करा.

**मुलांनी पालकांना काय सांगावे?**

१)वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर करू नये.

२)वाहन चालविताना सीटबेल्ट/हेल्मेटचा वापर करावा.

३)दारू पिऊन वाहन चालवू नये.

४)पादचाऱ्यांचा मान राखावा.

५)वेगाचे भान ठेवावे.

६)बेदरकारपणे आणि निष्काळजीपणाने वाहन चालवू नये.

७)आवशक्यते प्रमाणे हॉर्न वाजवावा.

८)शाळा, हॉस्पिटल व शासकीय कार्यालये येथे हॉर्न वाजवू नये.

९)ट्रफिक सिग्नलचा मान राखावा.

१०) कोणी आपणाकडे पहात नाही म्हणुन रहदारीचे नियम तोडू नयेत,

११) डिव्हायडर वरून उडया मारूनस्ता ओलांडू नका.

**रस्त्यावर पहिला हक्क कोणाचा?**

१)पादचाऱ्यांचा

२) फाट रस्त्यावर मोठ्या रस्त्यावरील वाहनांचा

३) वाहतूक बेटात जवळील वाहनांचा

४)आपल्या उजवीकडील वाहनांचा

**वाहन सुरू करताना घ्यावयाची काळजी**

१)वाहनाखाली / मागे कोणीही नसल्याची खात्री करा.

२)वाहनाचा आरसा सुस्थितीत करावा.

३)सिटबेल्ट बांधावा /हेल्मेट परिधान करावे.

४)योग्य इशारा करूनच वाहन रस्त्यावर आणावे.

**चौक पार करताना घ्यावयाची काळजी**

१)वेगावर नियंत्रण

२)योग्य मार्गिकेची निवड

३)समोरील वाहनांना प्राधान्य

४)थांबा, पहा व नंतरच पुढे जा

**वळणावर घ्यावयाची खबरदारी**

१)मनाचा निश्चय, वेगावर नियंत्रण, योग्य ती मार्गिका निवडणे.

२)निरीक्षण, आरशात पाहणे,रहदारीचे मुल्यमापन.

३)आधी इशारा मगच वळण.

४)उजवीकडील वळण लांबून व डावीकडील वळण जवळून पार करा.

५)वळण्याच्या दिशेवर नेत्र कटाक्ष.

**ओव्हर टेक करताना काय करावे ?**

१)ओव्हर टेक करताना रस्त्यावर तशी परवानगी असल्याची खात्री करा.

२)आपल्या वाहनाच्या पुढील, मागील व समोरील वाहनाची लांबी लक्षात घ्या.

३)आपल्या मागचा ओव्हरटेक करतोय का ते पहा.

४)इशारा करा, मागील वाहन आपल्या आरशात दिसल्यावरच लेन बदलून ओव्हरटेक करण्यास सुरूवात करा.

**खालील ठिकाणी ओव्हरटेक करू नका !**

१)झेब्रा क्रॉसिंगवर

२)चौकामध्ये

३)वळणावर

४)रेल्वे फाटकावर

५)उंचवट्यावर

६)रस्ता अरूंद असेल तर

७)मागील वाहन ओव्हरटेक करत असेल तर.

८)आपण द्विधा मनस्थितीत असाल तर.

**गाडी सोडून जाताना घ्यावयाची काळजी**

१)इंजिन बंद करा.

२)हॅन्ड ब्रेक लावा.

३)गाडी गिअर मध्ये ठेवा. सपाट रस्ता व चढावर पहिल्या गिअरमध्ये आणि उतारावर रिव्हर्स गिअरमध्ये पार्क करा.

४)गाडी योग्य ठिकाणी पार्क करा. चुकीच्या पध्दतीने, दुसऱ्याला किंवा वाहतूकीला अडथळा होईल अशा प्रकारे पार्किंग करू नका.

५)गाडी लॉक केली असल्याची खात्री करा.

**वाहन सुरू करताना घ्यावयाची काळजी**

१)वाहनाखाली /मागे कोणीही नसल्याची खात्री करा.

२)वाहनाचा आरसा सुस्थितीत करावा

३)योग्य इशारा करूनच वाहन सावकाश रस्त्यावर आणावे.

**आरसा**

१)आरसा वाहनाला बसविलेला असणे बंधनकारक आहे

२)वाहन चालू करण्यापुर्वी आरसा ॲडजस्ट करावाच.

३)वाहनास दोन प्रकारचे आरसे बसविलेले असतात

४)बाहेरील बहिर्गोल आरशावर objects in the mirror than they appear असे लिहिलेले असते. यातील प्रतिमा फसवी असते. प्रत्यक्षात वाहन जवळ असते.

५)वाहनाचा आतील आरसा सपाट असतो व यातील प्रतिमा खरी असते.

❃❃❃

# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था





# वाहन परवाना कसा मिळवावा

कुठल्याही सार्वजनिक स्थळावर मोटार वाहन चालवण्यासाठी चालक परवाना आवश्यक आणि अनिवार्य आहे. चालक परवाना स्थानीय वाहतूक प्राधिकारी देतात. चालकाजवळ त्याचे स्वतःचे नाव असलेला योग्य व त्या श्रेणीतल्या वाहनाचा चालक परवाना असणे आवश्यक आहे.

वाहन आणि सारथी : वाहतूक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी आणि संपूर्ण देशात एकसारखी व्यवस्था लागू करण्यासाठी सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने सेंट्रल मोटर व्हेईकल रूल्स १९८९ मध्ये काही तरतुदी केल्या आहेत. त्याप्रमाणे स्मार्टकार्ड आधारित चालक परवाना आणि नोंदणी प्रमाणपत्र दिलि जात. मंत्रालयाते त्यासाठी मानक सॉफ्टवेअर (नोंदणी प्रमाणपत्रासाठी वाहन व चालक परवान्यासाठी सारथी) तयार करून सर्व राज्यांना उपलब्ध केले आहे. हे सॉफ्टवेअर एकीकडे स्वचलनास मदत करते तर दुसरीकडे चालक परवाना आणि नोंदणी प्रमाणपत्र स्मार्टकार्डच्या रूपात देण्यास सक्षम करते. सर्व ॅंऊ६ डाटा वापरण्यासाठी आपसांत जोडली आहेत. मंत्रालयाने राज्य व राष्ट्रीय स्तरावर चालक परवाने व नोंदणी प्रमाणपत्रांचे राष्ट्रीय नोंदणी पुस्तक तयार करण्यासाठी ह्या डाटाचा उपयोग करण्याचे ठरविले आहे.

**चालक परवान्याचे मुख्य दोन प्रकार आहेत**

**शिकाऊ परवाना**

हा परवाना अस्थायी असून फक्त ६ महिन्यासांठी मान्य असतो. हा परवाना विशेष परिस्थितीत वाहनचालक शिकण्यासाठी देण्यात येतो.

**स्थायी परवाना**

हा परवाना स्थायी स्वरूपाचा असतो. हा वाहनचालकासाठी स्थायी दस्तऐवज आहे. कोणीही व्यक्ती शिकाऊ परवाना मिळाल्यापासून १ महिन्यात स्थायी परवाना घेण्यास पात्र असते.

**पात्रता**

चालक परवाना मिळविण्यासाठी विनंतीपत्र देताना व्यक्तीचे किमान वय १८ वर्षे असणे आवश्यक आहे. (व्यावसायिक वाहनांसाठी २० वर्षे, ५० सी सी इंजिन क्षमता असलेल्या वाहनांसाठी १६ वर्षे) पालक किंवा मातापित्यांची परवानगी आवश्यक आहे.

आवेदकाला वाहतुकीच्या नियमांची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

**शिकाऊ परवाना कसा मिळवावा?**

शिकाऊ परवाना मिळविण्यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१.विनंतीपत्र (स्थानीय वाहतूक अधिकाऱ्यांजवळ उपलब्ध)

२.निवास प्रमाणपत्र

३.वय प्रमाणपत्र

४.आवेदकाचे ३ पासपोर्ट आकाराचे अलीकडील फोटो

५.फॉर्म -१ ए वर आरोग्य प्रमाणपत्र

६.फार्म- १ स्वप्रमाणित आरोग्य पत्र

७.अधिकाऱ्याने निर्धारित केलेली फी

सर्व आवश्यक कागदपत्रांची तपासणी झाल्यावर रंग अंधत्वाची तपासणी केली जाते. त्यानंतर २० मिनिटांची एक शिकाऊ परिक्षा घेतली जाते. त्यात २० वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात व ही परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्यास शिकाऊ परवाना दिला जातो. शिकाऊ परवाना मिळविण्यासाठी होणाऱ्या परीक्षेपुर्वी तयारीसाठी अधिकारी आवेदकाला एक लहान पुस्तिका देतात. सर्व परीक्षा संपल्यावर शिकाऊ परवाना त्याच दिवशी देतात.

**स्थायी परवाना मिळवणे**

१.आवेदकापाशी वैध शिकाऊ परवाना असला पाहिजे.

२.स्थायी परवाना मिळविण्यासाठी शिकाऊ परवाना मिळण्याच्या ३० दिवसांनंतर आणि १८० दिवसांच्या आत आवेदन करणे आवश्यक आहे.

३.आवेदकाला वाहनचालन नियमांची आणि वाहतूक नियमांची, वाहनांच्या रचनेबद्दल संपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे.

**आवश्यक दस्त ऐवज**

१.वैध मूळ शिकाऊ परवाना.

२.फॉर्म क्रमांक ४ वर आवेदन.

३.आवश्यक शुल्क.

४.वय व निवास प्रमाणपत्र.

५.एक अलीकडचा पासपोर्ट आकाराचा फोटो.

६.व्यावसायिक परवान्यासाठी फॉर्म क्रमांक ५.

७.ज्या वर्गासाठी परवाना हवा असेल ते वाहन.

सर्व आवश्यक कागदपत्रांच्या तपासणीनंतर आवेदकाला वाहन चालनाची परीक्षा द्यावी लागते. त्या परीक्षेत आवेदकाची वाहनचालन कौशल्य, वाहनाची सवय, वाहतुकीच्या नियम कायद्याबद्दल त्याच्या

ज्ञानाची परीक्षा होते. आवेदक ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास त्याला / तिला स्थायी वाहन चालन परवाना दिला जातो. आवेदक अनुत्तीर्ण झाल्यास तो / ती ७ दिवसानंतर परत परिक्षा देऊ शकतो / शकते.

**वाहन चालवताना खालील सूचना जरूर पाळा**

१)आपल्या वाहनास अपघात झाल्यास नुकसान भरपाई मिळण्यासाठी वाहनाचा विमा उपयुक्त आहे, तसेच तो कायद्याने आवश्यक देखील आहे. कृपया विमा मुदतीत असल्याची खात्री करून घ्या आणि विम्याचे पेपर सोबत बाळगा.

२)आपले वाहन सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. त्यामध्ये टायर्स, ब्रेक स्टेअरिंग, सस्पेन्शन या बाबत विशेष खबरदारी घ्यावी. किरकोळ दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे साहित्य जवळ बाळगावे.

३)वाहनाची आसन क्षमता वाढवू नका.

❋❋❋


# सुरक्षा अभियान ट्रस्ट
ट्रस्ट नोंदणी क. इ-३९५०
रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था





# रस्त्यावरील वाढते अपघात, कारणे व उपाय

सकाळी वर्तमानपत्र हातात पडताच पहिल्याच पानावर एकतरी अपघाताची बातमी हमखास असते यावरून आपल्याला रोज घडत असलेल्या अपघातांची काही प्रमाणात तरी कल्पना आल्याशिवाय राहत नाही म्हणतात ना 'नेहमीच मरे त्याला कोण रडे' या उक्तीप्रमाणे लोकांनाही या बातम्या वाचायची सवय झाली आहे दूरदर्शनवरही आपल्याला अनेक वृत्तवाहिन्यांवरून रोज अपघाताच्या बातम्या पाहायला मिळतात मात्र ही गोष्ट करण्यासारखी नक्कीच नाही. अपघातात ज्यांचे नातेवाईक प्राणाला मुकतात किंवा गंभीररीत्या जखमी होतात, त्यांनाच त्याची खरी झळ सोसावी लागते. म्हणतात ना, 'ज्याचं जळतं, त्यालाच कळतं' हल्ली अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढझालेली दिसून येते.

## अपघाताची कारणे

साधारणपणे अपघाताची खालील कारणे दिसून येतात.

१)दिवसेंदिवस वाहनांची संख्या फार वाढत आहे. वाढलेल्या वाहनांच्या संखेमुळे निश्चितपणे अपघाताच्या संखेत वाढ झाल्याशिवाय राहत नाही.

२)रस्त्यावरील खड्डेही अपघातांची शक्यता वाढवतात.

३)नव श्रीमंतांमध्ये मुलांचे फाजील लाड होतांना दिसतात. पैशाच्या गरमीमुळे ते आपल्या मुलांना अपरिपक्व वयातच गाडया चालवायला देतात व त्यांच्याकडून अपघात होतात. याच मुलांमध्ये वेगाचा थरार अनुभवाने तसेच शर्यती लावण्याची प्रवृत्ती दिसून येते, ज्याचे पर्यावसान अपघातात होते.

४)नशा करून गाड्या चालवणाऱ्या चालकांमुळेही अपघात होतात.

५)व्यावसायिक गाड्यांच्या चालकांना कधीकधी रात्रंदिवस ड्युटी करावी लागते व त्यामुळे झोप न लागल्यामुळे किंवा ताबा सुटल्यामुळे अपघात होतात.

६)हल्ली मोबाईल फोनवर बोलताना गाडी चालवणाऱ्यांचे प्रमाणही फार वाढले आहे त्यामुळे अपघात होतात.

७)रहदारीच्या नियमांचे पालन न केल्याने अपघात होतात. रहदारीचे नियम तोडणाऱ्यांची संख्या फार वाढली आहे. याला कारण लोकांच्या खिशात खुळखूळणारा पैसा .

८)पायी जाणारे लोकही आडवेतिडवे

धावल्यामुळे अपघात होतात. कधीकधी प्रमाणाबाहेरचा धीडपणा पायी चालणाऱ्याचा प्राण घेतो.

९)अनेकदा सिग्नलच्या आसपास दडून बसलेले रहदारी पोलिस अचानक समोर आल्याने चालक गोंधळून जाऊन अपघात होतात.

१०)वाहनांची नीट देखभाल केली नाही व ते अचानक बंद झाले तरीही अपघात होऊ शकतो.

<u>उपाय-</u>

१)वाहनांच्या संख्येवर नियंत्रण आणायला हवे. हौसेखातर डझनावारी गाडया ठेवणाऱ्यांच्या जास्तीत जास्त वाहन संखेला मर्यादा असावी.

२)लोकजागृती करून बस, रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहनांचा वापर करायला प्रोत्साहन दयावे.

३)एकाच मार्गाने जाणाऱ्यांनी एकाच वाहनाचा वापर करावा. कमीतकमी एकाच कुटुंबातील लोकांनी स्वतंत्र वाहनाचा अट्टाहास धरू नये. उदा. एकाच ठिकाणी कार्यरत असणारे दोन भाऊ किंवा इतर सभासद यांनी एकाच वाहनाने प्रवास करावा.

४)वाहनांच्या प्रमाणात रस्त्यांची निर्मिती व्हावी, रस्त्यांचे रूंदीकरण व्हावे.

५)रहदारीचे नियम तोडणारे, नशा करून गाडी चालवणारे व मोबाईल फोनवर बोलून गाडी चालवणाऱ्यांना मोठा दंड व शिक्षेची तरतूद असावी.

६)वाहन चालवणाऱ्यांनीही रहदारीच्या नियमांचे पालन केले पाहिजे कारण जीवन अनमोल आहे.

७)पायी चालणाऱ्यांनीही काळजी घेणे आवश्यक आहे.

८)वाहतुक हवालदारांनीही केवळ लोकांना दंडित करण्याच्या किंवा त्यांच्याकडून काही तोड करण्याच्या भावनेने उभे न राहता आपण जनतेचे सेवक आहोत, आपण वेतन घेतो याची जाणिव ठेवून चौकात सर्व बाजूंनी येणाऱ्यांना स्पष्ट दिसेल असे उभे रहावे रहदारी योग्य पध्दतीने नियंत्रित करावी.

९)अपघात झालाच तर सर्वप्रथम जखमीला वैदकीय मदत लवकरात लवकर कशी मिळेल याला प्राधान्य दयावे. अशा वेळी तांत्रिक बाबी बाजूला ठेवून वेळ न दवडता जखमीला मदत करावी. मदत करणाऱ्यांनीही घाबरू नये व पोलिसांनीही अशा मदत कारणाऱ्यांना कायदयाचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

**'सुरक्षित प्रवास' हेच आपले ध्येय असावे.**

❃❃❃

# रस्ता सुरक्षा जीवन रक्षा

## हे करा

१) अपघात ग्रस्तांना त्वरीत मदत करा.

१०८या टोल फ्री क्रमांकावर फोन करा.

२) दुचाकी चालवताना दोघानीही हेल्मेटचा वापर करा.

३) चारचाकी वाहनात सगळ्यांनी सिटबेल्ट लावा.

४) दोन वहानांमध्ये सुरक्षित अंतर ठेवा.

५) ओव्हरटेक नेहमी उजव्या बाजूने करा.

६) वाहनातून उतरतांना नेहमी डावीकडून उतरा.

## हे करू नका

१) अंधवळणावर ओव्हरटेक करू नका.

२) अतिवेगाने वाहन चालवू नका.

३) वाहन चालवितांना मोबाईलचा वापर करू नका.

४) मद्य किंवा अमली पदार्थाचे सेवन करून वाहन चालवू नका.

५) वाहनात जादा प्रवासी ओव्हर लोड करू नका

६) मुलांना लहान वयात वाहन चालवू देऊ नका.

७) रात्री वाहन बंद पडल्यास ते रस्त्याच्या कडेला ठळक दिसेल असे उभे करा.


# सुरक्षा अभियान ट्रस्ट

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षा विषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था



# सुरक्षा अभियान कार्यशाळेतील 2023 मधील काही क्षणचित्रे




जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे आणि सुरक्षा अभियान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने कार्यशाळेचे आयोजन




कार्यशाळेत सहभागी झालेल्यांना प्रमाणपत्रांचे वाटप डॉ. विलास पवार (अध्यक्ष-सुरक्षा अभियान ट्रस्ट) यांच्याकडून



रस्ता सुरक्षा विषयावरील सादरीकरण करताना ॲड. विराट पवार (सचिव-सुरक्षा अभियान ट्रस्ट)

SAFETY FOR ALL
ALL FOR SAFETY

सुरक्षा मध्ये आपली भलाई
ती तर आहे जीवनाची खरी कमाई.




या भारताचे आम्ही नागरिक दक्ष
स्वसुरक्षाकडे देऊ आम्ही नेमाने लक्ष